# श्री साईलीला



मराठी :- बाबा व वासुदेवानंद सरस्वती यांतील बंधुभाव

एप्रिल ६० पैसे १९७५

# अनुक्रमणिका – एप्रिल १९७५


| | |
|---|---|
| १. संपादकीय | प्रभू मोर्ग साईराम; वर्षारंभ अंक |
| २. नवे मुख्यमंत्री-शंकररावजी चव्हाण | सदानंद चेंदवणकर |
| ३. काँग्रेस हाऊससमोरचे श्री साईमंदिर | श्री. चंद्रकांत सामंत |
| ४. साईभक्त श्री. काकासाहेब अवस्थी | सदानंद चेंदवणकर |
| ५. श्री साईलीला | श्री. सूर्यकांत माधव गर्जे |
| ६. हृदयस्थ | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ७. मी मेडिकलला जाते | कु. संजीवनी प्रभाकर मुळे |
| ८. वाऱ्यावरचे विचार – ६ लपंडाव | श्री. द. शं. टिपणीस |
| ९. श्री साईबाबांच्या धूनीचे महत्त्व | श्री. श्रीराम सातर्डेकर |
| १०. महर्षि अरविंदांची भविष्यवाणी | श्री. बाळकृष्ण धामणकर |
| ११. श्रीसाईनाथ चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| १२. ज्योतिषशास्त्राचा ओनामा | होरालंकार शं. वा. देवधर |
| १३. शिरडीवृत्त | — |
| १४. शिरडीचा रामजन्म सोहळा | सौ. सुशीलाबाई हजारे |
| १५. स्वप्नातच मी आज पाहिले | श्री. नारायण चिपळूणकर |
| १६. माझ्या मनीची आस | श्री. श्रीकृष्ण गंधे |
| १७. श्री साईनाथाची आरती | श्री. कोंडाजी रामभाऊ बेंडे |
| १८. श्री साई भूपाळी | श्री. विनायक पाठक |
| १९. सद्‌भाव ओवी | श्री. नरेंद्र कृष्ण |
| २०. स्वानंदाचा आनंद | सौ. कलावती व. चव्हाण |
| २१. साई तुझे चरण | श्री. दत्ताराम बारस्कर |
| २२. पावन केले पतिताना | श्री. प्रकाश सहस्रबुद्धे |
| २३. विठ्ठल विठ्ठल साई | श्री. उद्धव भावसार |
| २४. साईभक्तांचा कैवारी | सौ. लीला पंडितराव देशमुख |
| २५. शिरडी द्वारी | श्री. श्रीधर प्रभुणे |
| २६. आईचा धावा | श्री. दत्ताराम मोरे |
| २७. चिदानंद हे साई | सौ. माई आडकर |

जगा लावावे सत्पथी। हेचि साईलीलेची कृति ॥



# श्री सा ई वा क्सु धा

स्वप्नांत सोन्याच्या गारा वर्षति । प्रयत्नें साठवण केल्या अमिती ।
वांटे वेळीं कामास येती । हारवून जाती जागृतीं ॥ २० ॥
दृष्टा दृष्ट–भोगवासना । आशा तृष्णा वा कामना ।
सदैव प्रतिबंधक जाणा । समूळ खाणा या आधीं ॥ २१ ॥
अशक्य दिसाया सूर्यकरें । बुद्धि जेथूनि माघारी फिरे ।
जेथ वेद श्रुतीचें पाऊल न शिरे । तें निजकरें गुरु दावी ॥ २२ ॥
काम-क्रोध उभयवृत्ति । करूं न देती ज्ञानप्राप्ति ।
श्रवण-मनन-समाधि विच्छित्ति । हातोहातीं त्या करिती ॥ २३ ॥
दीपा कर्पूरा होतां लगटी । संभवे काय लोटा लोटी ।
उभयत्र भेटी होण्याची खोटी । दीपत्वें उठे कर्पूर ॥ २४ ॥

श्रीसाईसच्चरित्–अध्याय १७ वा

---


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५४ वे ] एप्रिल १९७५ [ अंक १

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्‌डी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०–६० फक्त.

*

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४–बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३२६१

संपादकीय-

# प्रभू मोरे साईराम

## त्रेपन्नाव्या वर्षाचा पहिला अंक



श्रीसाईलीलेचा गुढीपाडवा आणि श्रीरामनवमी या दोन्ही उत्सवांच्या सुमारास प्रसिद्ध होणारा हा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला नेहमीप्रमाणे अत्यंत समाधान वाटत आहे. गेल्या हजारो वर्षापासून ठराविक दिवशी दरवर्षी गुढीपाडवा व रामनवमी येते व शिरडी येथे हे दोन्ही उत्सव अतीव उत्साहाने साजरे केले जातात.

विशेषतः शिरडी येथे रामनवमी उत्सव तर अभूतपूर्व उत्साहाने व थाटाने साजरा केला जातो. शिरडी येथे जे काही उत्सव होतात, त्या सर्व उत्सवांचा राजा म्हणजे रामनवमी उत्सव होय. तिथे प्रत्येक उत्सवाला महत्त्व हे असतेच परंतु रामनवमी उत्सवाचे महत्त्व काही आगळेच आहे. कोणत्याही उत्सवापेक्षा या उत्सवास जनसंमर्द विशेष मोठ्या प्रमाणात हजर राहून रामभक्तीचा व रामनामाचा आनंद लुटीत असतो.

रामनामाचे महात्म्यच फार मोठे आहे. आपल्या हिंदु धर्म समाजाच्या दृष्टीने तर ते नाव पुण्यपावन व तारक होऊन राहिलेले नाव आहे. भारतात प्राचीन काळापासून वंदनीय असे महापुरुष असंख्य होऊन गेले. परंतु रामनामाने आबालवृद्ध जनतेच्या मनाची जी पकड घेतली आहे तशी दुसऱ्या कोणत्या नावाने घेतलेली

आहे ? सुशिक्षित असो अथवा अशिक्षित असो, ज्याच्या मुखातून रामनाम येत नाही असा हिंदु या जगात कुठेही सापडणार नाही.

भगवान श्रीसाईबाबांनी आपल्या हयातीत रामनवमी उत्सव सुरू केला व त्याची जबाबदारी आपले परमशिष्य ह. भ. प. श्रीदासगणू महाराज यांचेकडे सोपवून तो अखंड चालू रहाण्याची चोख व्यवस्था केली. श्रीदासगणूंनीही आपली ती जबाबदारी पार पाडण्यात कधीही कसूर केली नाही. जोपर्यंत त्यांना हालचाल करण्याची शक्ती होती तोपर्यंत त्यांनी शिर्डी येथे जातीने हजर राहून वर्षानुवर्षे हा महोत्सव साजरा केला व नंतर आपले पट्टशिष्य श्री. अनंतराव आठवले यांचेवर त्यांनी ही जबाबदारी सोपविली. ती शिरावर घेऊन उत्तम प्रकारे व अत्यंत समाधानकारक रितीने पार पाडण्यासाठी मनोभावे झटणारा दुसरा कोणी सापडला असता किंवा नाही याबद्दल शंका वाटते. कारण या कार्यक्षेत्रातील अनंतरावजींची आजवरची कामगिरी खरोखर अभिनंदनीय व प्रत्येकास आत्यंतिक समाधान देणारी अशीच आहे. प्रतिवर्षी कर्तव्यबुद्धीने व आपल्या शिरावरील पवित्र जबाबदारी पार पाडण्यासाठी या उत्सवाच्या दिवसात अनंतरावजी येतात व आपली जबाबदारी पार पाडून जाताना सर्वांकडून धन्यवाद घेऊन जातात. त्यांची परिणामकारक कीर्तने हे एक या उत्सवातील मोठ्यात मोठे आकर्षण होय. या जगात दुसऱ्याकडून धन्यवाद मिळविणे व तसे वर्तन ठेवणे यासाठी तर आपला जन्म आहे. जो जो आपले कर्तव्य श्रद्धायुक्त अंतःकरणाने पार पाडण्यासाठी झटेल, त्यातच धन्यवादाची दौलत मिळविलेली आहे.

श्रीसाईबाबांनी प्रभू रामचंद्रांना एवढे महत्त्व दिले व त्यांच्याच प्रेरणारुपे शिरडी येथे गेल्या अनेक वर्षांपासून रामजन्मोत्सव साजरा होत आला आहे. यावरून रामचरित्राला बाबा महत्त्व देत व एक आदर्श महापुरुष या दृष्टीने ते त्यांच्याकडे पहात असत. या जगात जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाचे कल्याण झाले पाहिजे व त्यासाठी त्याच्यापुढे उच्चात उच्च असा आदर्श असणे जरुर आहे हे ओळखून बाबांनी श्रीरामचंद्राचा आदर्श या महोत्सवाच्या रूपाने सर्वांपुढे ठेवला.

रामनामाची गोडी अवीट आहे. ते कितीही वेळा घेतले तरी कंटाळा न येता मन अधिकाधिक पवित्र बनत जाते. रामनामात सामर्थ्य आहे, त्यात अजब किमया भरलेली आहे. ‘ निर्बलके बल राम ’ असे नेहमीच म्हटले जाते. जेथे रामनाम घेतले जाते, तेथे दुबळेपणा निःसत्वपणा रहातच नाही. रामनाम हे पुरुषार्थाला व पराक्रमाला प्रेरणा देणारे आहे. आम्ही दुबळेपणा सोडून देऊन पराक्रमी बनावे, कर्तव्यपरायण बनावे, माता पिता, पत्नी, बंधू, मित्र व गुरुजन या पैकी प्रत्येकाच्या बाबतीत आपले काही ना काही तरी कर्तव्य हे असतेच ते पार पाडण्यातच मनुष्यत्व आहे. या मनुष्यत्वाच्या कर्तव्याची जाणीव व्हावी, त्याच्याकडून कर्तव्याचरण घडावे हेच प्रत्ये-

काचे वैभव आहे. बाबा हे माणुसकीचे भुकेलेले होते. प्रत्येकाने कर्तव्याचरण करून व माणुसकीचा धर्म पालन करून जन्मा आलेल्यांचे सार्थक व्हावे ही बाबांची अपेक्षा व ती सफल व्हावी यासाठी मर्यादास्वरुप प्रभू श्रीरामचंद्राच्या पुण्यस्मरणाला त्यांनी एवढे महत्त्व दिले आहे.

श्रीराम हा जीवनमंत्र आहे. संपूर्ण श्रद्धायुक्त अंतःकरणाने या पुण्यपावन मंत्राचा जो कोणी जप करील त्याचे कोटकल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. बाबांनी हे बरोबर जाणले होते.

आपल्या मनाने रामनामाची कायमची पकड घेतली पाहिजे. त्या महान् पुरुषाच्या जीवन कार्याचे रहस्य आम्ही ओळखले पाहिजे. त्याविना दुसरे काही सुचता कामा नये; याची जाणीव करून देण्यासाठी श्रीराम जयंती प्रतिवर्षी येते. श्रीरामासारख्या [illegible] पुरुषोत्तम आदर्श महापुरुषाच्या आकाशात [illegible] बावरण्यासाठी आपण झटावे ही बाबांची इच्छा या प्रतिवार्षिक महोत्सवाच्या रूपाने प्रकट होत असते. त्या इच्छेपुढे आपण सर्वजण नतमस्तक होऊ [illegible]

चोपन्नाव्या वर्षाचा पहिला अंक श्रीसाईलीलेतील [illegible] वर्षाचा हा पहिला अंक श्री साईभक्तांच्या हाती देण्यास आम्हांस आनंद वाटत आहे. गेली त्रेपन्न वर्षे मराठीतील हे मासिक सातत्याने प्रकाशित होत आहे. श्रीसाईलीलेचे वाचक अधिकाधिक वाढत चालले आहेत. [illegible] मुंबईच्या व शिर्डीच्या दोन्ही कार्यालयांतील अंकांचे गठ्ठे शिल्लक रहात नाहीत. सर्वांच्या सर्व अंक खपतात. वाचकात भक्तिभाव [illegible] या मासिकात जास्तीत जास्त नवनवीन व रंजक अशीच माहिती व सदरे देण्याचा आमचा विचार आहे. तसेच ते जास्तीत जास्त सचित्र करण्याचाही आमचा दृष्टिकोन आहे. तेव्हा वाचकांनी आम्हांस सर्व दृष्टीने जास्तीत जास्त सहकार्य द्यावे. वाचकांच्या सहकार्यावरच या मासिकाची [illegible] वाटचाल आहे.

महाराष्ट्र राज्याचे नवे कर्तबगार नेतृत्व

# ना. श्री. शंकरराव चव्हाण

● सदानंद चेंदवणकर

महाराष्ट्र राज्याचे चौथे नवे मुख्यमंत्री ना. श्री. शंकरराव चव्हाण यांनी गेल्या महिन्यात राज्याच्या अधिकारपदाची सूत्रे आपल्या हाती घेतली याबद्दल



आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. शंकररावजी मुख्यमंत्री झाल्याचे समजताच श्रीसाईबाबा संस्थानचे वतीने त्यांचे सर्वात प्रथम शाल व श्रीफल अर्पण करुन अभिनंदन करण्यात आले होते. ना. शंकररावजी परम साईभक्त आहेत. त्यांच्या पत्नी सौ. कुसुमताई या पण बाबांच्या भक्त आहेत आणि विशेष उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे या राज्याचे मुख्यमंत्रीपद लाभल्याचे त्यांना गुरुवारीच कळले.

श्री. शंकररावजी' मराठवाड्यातील ज्येष्ठ कॉंग्रेस नेते, कुशल प्रशासक आणि अबोल असे कार्यकर्ते आहेत. १९५६ सालापासून महाराष्ट्र त्यांना ओळखतो आहे. गेल्या १९ वर्षांत त्यांनी द्विभाषिक मुंबई राज्य व नंतरच्या महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात विविध खात्यांच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या व एक अभ्यासू व कर्तव्यदक्ष प्रशासक म्हणून नावलौकीक कमावला आहे, कारण जनतेसाठी सतत कार्यरत राहून आपले उद्दिष्ट पूर्ण करणे हा त्यांचा स्वभावधर्म दिसून येतो.

श्री. शंकररावजी यांचा जन्म १४ जुलै १९२० रोजी मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील दक्षिणगंगेच्या पवित्र तीरावरील संतांचे शिरोमणी संत एकनाथांची कर्मभूमी असलेल्या पैठण या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. अगदी लहानपणीच त्यांनी एक अभ्यासू, नेमस्त, बुद्धिमान व हुशार विद्यार्थी म्हणून नाव मिळविले, व हेच गुण त्यांना पुढील आयुष्यात उपयोगी पडले. आपला अभ्यास रोजच्या रोज संपविल्याशिवाय ते झोपी जात नसत. त्यांचे प्राथमिक व दुय्यम शिक्षण पैठण व औरंगाबाद येथे झाले. पुढे हैद्राबाद या निजामराज्याची राजधानी असलेल्या शहरातील सिटी कॉलेज व निजाम कॉलेजमध्ये त्यांनी उच्च शिक्षण घेतले. मद्रास विद्यापीठाचे पदवीधर झाल्यावर उस्मानिया विद्यापीठातून त्यांनी एल. एल.

बी.ची पदवी संपादन केली. कायद्याची पदवी घेतल्यावर त्यांनी काही दिवस वकिली केली परंतु 'चले जाव'ची चळवळ सुरू झाल्यावर त्यांनी वकिली सोडली व चळवळीत सक्रीय भाग घेतला. हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या चळवळीतही त्यांनी भाग घेतला व प्रसंगी भूमीगत राहून कार्य केले.



२३ मार्च ७५ रोजी श्री. शंकररावजींनी शिर्डीस भेट दिली व श्रीसाईनाथ रोजनिशीचे उद्घाटन केले त्यावेळी समाधीस्थानावर

---

१९४५ साली श्री. शंकररावजींनी राजकारणात प्रवेश केला. १९५२ ते ५ हा काळ ते नांदेड नगरपालिकेचे अध्यक्ष होते. नांदेड जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे पाच वर्षे ते उपाध्यक्ष होते. हैद्राबाद राज्य सहकारी बँकेच्या संचालकमंडळावर ते संचालक होते. नांदेड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे चव्हाणसाहेब १९५० ते १९५ पर्यंत चिटणीस होते. तसेच हैद्राबाद प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे दोन वर्षे सरचिटणीस होते. श्री. चव्हाण हे अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे व महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस समितीच्या कार्यकारिणीचे सदस्य आहेत. नांदेड धर्माबाद येथे शैक्षणिक कार्यात भाग घेऊन तिथे त्यांनी अनुक्रमे यशवंत महाविद्यालय व लालबहादुर शास्त्री महाविद्यालयांची स्थापना केली, विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची पण त्यांनी तिथे सोय केली.

श्री. चव्हाण यांची १९५७ साली महाराष्ट्र विधान परिषदेवर निवड झाली. १९५६ मध्ये त्यावेळच्या द्विभाषिक मुंबई राज्यात श्री. यशवंतराव चव्हाण मंत्रिमंडळात श्री. शंकरराव चव्हाण महसूल खात्याचे उपमंत्री झाले. १९५६ ते ६० पर्यंत ते त्या पदावर होते.

१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर महाराष्ट्राच्या पहिल्या मंत्रीमंडळात श्री. शंकरराव यांचा पाटबंधारे व वीज खात्याचे मंत्री म्हणून समावेश झाला. १९६२ मध्ये त्यांनी नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद संघातून निवडणूक लढविली व ते महाराष्ट्र विधान सभेवर निवडून गेले व पुन्हा त्यांची पाटबंधारे व वीज मंत्री म्हणून नियुक्ति झाली. त्यांनी त्यावेळी केलेला वीजेसंबंधीचा अभ्यास तंत्रज्ञांनाही लाजविणारा असा होता. १९६७च्या सार्वत्रिक निवडणुकीत श्री. चव्हाण भोकर मतदार-संघातून निवडून आले, पुन्हा पाटबंधारे व वीज खात्यांचे मंत्री झाले, व त्याचवेळी कॉंग्रेस विधिमंडळ पक्षाचे उपनेते म्हणून त्यांची निवड झाली. श्री. शंकररावजींनी एकूण बारा वर्षे पाटबंधारे व वीज खात्याचे मंत्रीपद भूषविले. या काळात त्यांनी जलसिंचन क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने अनेक योजना राबविल्या ; या दृष्टीने महाराष्ट्रा-तील सर्वात मोठा जलसिंचनाचा प्रकल्प म्हणून जायकवाडीचा निर्देश करता येईल. या प्रकल्पाचे जनक श्री. शंकररावच आहेत. १९७२ च्या निवडणुकीत ते पुन्हा भोकर मतदारसंघातून विजयी झाले व त्यांची कृषी व राज्यमार्ग परिवहन खात्याचे मंत्री म्हणून निवड झाली आणि आता तर महाराष्ट्र राज्याची मुख्यमंत्री पदाची धुराच त्यांनी वाहिलेली आहे.

श्री. शंकरराव चव्हाण यांची रहाणी अत्यंत साधी आहे. श्री. यशवंतराव चव्हाणांना ते आपले राजकीय गुरु मानतात. संगीत व नाटकाची त्यांना अत्यंत आवड आहे. महाराष्ट्रातील दीनदलित जनतेबद्दल त्यांना आस्था असून सामान्य माणसाचे हित व कल्याण साधणे या गोष्टींवर त्यांनी आपले लक्ष केंद्रीत केलेले आहे. सामाजिक व आर्थिक स्थित्यंतर घडवून आणण्यासाठी भरभक्कम पाऊले उचलून सामान्य माणसाचे मनात लोकशाहीबद्दल आदर व विश्वास निर्माण करण्याचे कार्य आपण जर केले तर लोकशाही मजबूत होऊन या देशाची एकता, श्रेष्ठत्व व एकात्मता वाढीस लागेल असा त्यांना विश्वास वाटतो. श्री. शंकररावजी शंकरभक्त आहेत ; तसेच ते श्री साईबाबांचेही भक्त आहेत. संत एकनाथांच्या बद्दल त्यांच्या मनात गाढ श्रद्धा आहे. ते स्वतः मोठे भाविक आहेत. शिवलीलामृत व श्री साई सच्चरित्रातील अध्यायांचे ते वाचन करतात. अहमदनगर किंवा औरंगाबाद बाजूकडे ते गेले रे गेले की शिर्डीला ते हटकून भेट देतातच. साईबाबांचे दर्शन घेतात, समाधीला अभिषेक करतात आणि भाविक, श्रद्धायुक्त अंतःकरणाने वंदन करतात. शंकररावजींची ही स्पृहणीय सेवा वृद्धिंगत होवो, हीच साईचरणी प्रार्थना !

# "कॉंग्रेस हाऊस समोरील श्रीसाई मंदिर"

लेखक–श्री. चंद्रकांत दामोदर सामंत



मुंबई शहराच्या मध्यभागी विठ्ठलभाई पटेल रोडवर असलेले 'कॉंग्रेस हाऊस' हे मागील कित्येक वर्षांपर्यंत राजकीय वर्तुळात एक फार प्रसिद्ध ठिकाण समजले जात असे. 'कॉंग्रेस हाऊस' व त्याला लागूनच असलेल्या 'जीना हॉल' ह्या वास्तू स्वातंत्र्यपूर्व काळात व त्यानंतरही बरीच वर्षे जनजागृतीची केंद्रस्थाने होती. कॉंग्रेस दुभंगण्यापूर्वी मुंबईतल्या नव्हे, किंबहुना भारतातल्या राजकारणाची सूत्रे येथून हालत असत असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही. ह्या दोन इमारतींच्या मध्यबिंदूच्या समोरील बाजूस एक लहानसा बोळ आहे. जवळ जवळ वीस एक फूट लांबीच्या ह्या बोळाच्या पलिकडे लगेचच डाव्या हाताला एक छोटेसे खासगी देऊळ आहे. खासगी म्हणजे मालकीच्या दृष्टीने, पण तसे पाहिले तर ह्या देवळाला 'खासगी' किंवा 'देऊळ' ही दोन्ही वर्णने लागू पडतील की नाही ह्याची शंका आहे. एकतर ह्या देवळाला ना दरवाजे ना कुलपे! दुसरे म्हणजे येथे ना कोणाही धर्मीयाला वा पंथीयाला मज्जाव! तेव्हा ह्या जागेला "श्रद्धास्थान" हेच नाव अधिक शोभून दिसते.

ह्या जागेत शेजारच्या चित्रात दर्शविल्याप्रमाणे श्री साईबाबांची प्लास्टरची एक बसलेली मूर्ति आहे. त्या मूर्तीची उंची चारपाच फुटांच्या आसपास आहे व ती सुप्रसिद्ध मूर्तिकार व साईभक्त श्री. जाधव मास्तर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांनी बनविलेल्या आराखड्यानुसार श्री. बेलिम ह्यांनी तयार केली आहे. ही मूर्ती इतकी हुबेहूब घडली आहे की, अनेकच भक्त मंडळींना, निदान प्रथमदर्शनी तरी

(पान ४७ वर पहा)

कै. दाजी कृष्णराव दळवी हे साईभक्त होते व त्यांनी बाबांना प्रत्यक्ष पाहिलेही होते. नानासाहेबांना साईभक्तीचा वारसा त्यांच्या आजोबांकडूनच मिळाला. नानासाहेब सध्या ६८ वर्षांचे असून वडिलोपार्जित लाकडाचा व कोळशाचा व्यापार सांभाळतात.

प्रत्येक गुरुवारी, महाशिवरात्री, गुढीपाडवा, रामनवमी, दसरा, दत्तजयंती ह्या दिवशी तसेच दरवर्षी डिसेंबर/जानेवारी महिन्यात मंदिरात श्रीसत्यनारायणाची महापूजा होते. श्रीसाईनाथांच्या भक्तमंडळींकडून घातलेली वस्त्रे वेळोवेळी गोर-गरिबांना व इतर भक्तांना फुकट वाटली जातात व त्याची नोंदही ठेवली जाते. मंदिरात होणाऱ्या धार्मिक विधीसाठी तसेच प्रसाद नैवेद्य वगैरे निमित्त होणारा खर्च भक्तमंडळींकडून परस्पर केला जातो. मंदिरात हिंदुप्रमाणेच, पारसी, शीख, ख्रिश्चन व इतर जमातीतील लोक दर्शनासाठी मोठ्या संख्येने येत असतात. मंदि-रातील दैनंदिन व सणावारांची चोख व्यवस्था एक तरुण, निष्ठावान साईभक्त श्री. मधुकर महादेव पवार हे अत्यंत कळकळीने व श्रद्धेने पार पाडीत असतात. सदर मंदिरामुळे मुंबईच्या एका मध्यवर्ति व गजबलेल्या विभागातील साईभक्तांची फारच मोठी सोय झाली आहे. श्री साईधामाच्या जवळच हे मंदिर आहे. यामुळे साईधामला दर्शनार्थ गेलेले भक्त पुढे लगेच या देवळात बाबांचे दर्शन घेतात.

गाठीभेटी - ९ ७८व्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन

## श्री साईबाबांना तरुण वयात पाहिलेले भक्त

# श्री. काकासाहेब अवस्थी

-सदानंद चेंदवणकर



भगवान श्री साईबाबांना अनंतात विलीन होऊन आता सत्तावन वर्षे झाली आहेत. एवढा दीर्घकाळ लोटला आहे. त्यामुळे बाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या, त्यांचा दर्शनलाभ झालेल्या व्यक्ती आता दुर्मिळ झाल्या आहेत. ज्या काही आहेत त्यांना बाबांना पाहिलेल्याची स्मृती स्पष्टपणे आठवतही नाही. परंतु वाचकहो, भक्तजनहो, बाबांचे दर्शन, हो अगदी जवळून दर्शन व ते पण अनेकदा घेऊन त्यांच्या विषयीच्या एक ना दोन नाना आठवणी मोठ्या भक्तिभावाने कथन करणारे एक भाग्यवंत साईभक्त आज आपल्यात आहेत व ते म्हणजे श्री. अवस्थीकाका.

काका सध्या पुण्याला असतात. बाजीराव रस्त्याच्या एका टोकाला चिंचेच्या तालमीजवळ त्यांचे निवासस्थान आहे. त्यांचे खरेखुरे नाव नारायण पुरुषोत्तम

अवस्थी. यंदाच्या गुढीपाडव्याला म्हणजे १२ एप्रिलला त्यांना ७८ वर्षे पूर्ण होऊन ते ७९ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत.

काका मूळचे मराठवाड्यातले. उस्मानाबाद जिल्ह्यात परांडा येथे त्यांचा जन्म १२ एप्रिल १८९७ रोजी (चैत्र शु. दशमी शके १८१८) झाला. त्यांचे वडील उज्जैनला सेशन्स जज्ज होते. २० जून १९४८ रोजी ते निवर्तले. काकांच्या मातोश्रीचे नाव रमाबाई. चार कन्या व एक पुत्र अशी अपत्यसंपदा त्यांना लाभली. त्यापैकी एकमेव पुत्र म्हणजेच आपले काकासाहेब होत. काकांचे प्राथमिक शिक्षण पुणे व दुय्यम शिक्षण इंदूर येथें झाले. गुरुदेव जस्टिस एम. बी. रेगे यांच्या कुटुंबियां-समवेत काका १९१५ साली अगदी पहिल्यांदा शिर्डीस गेले. त्यावेळी शिर्डीला जायचे म्हणजे कोपरगावाहून टांग्याने किंवा खटाऱ्याने जावे लागे. काका शिर्डीस पहिल्यांदा जेव्हा आले तेव्हा त्यांचे वय अठरा वर्षांचे होते. तेव्हा ते अगदी तरणेबांड युवक होते. १९१५ पासून आजतागायत ते शिर्डीस येत आहेत. आपली शिरडीची वारी त्यांनी कधीही खंडित केली नाही.

काका हे सुखवस्तु कुटुंबातले जरी असले तरी तरुणपणात त्यांनी हिरे-मोत्यांचा जवाहिऱ्याचा धंदा केला आहे. पुण्यातल्या बुधवार पेठेत त्यांचे एक दुकानच होते. त्या दुकानावर बसून ते आपला धंदा पहात असत.

१९१५ पासून १९१८ पर्यंत अवस्थीकाकांनी श्रीसाईबाबांचे अगदी डोळे भरून दर्शन घेतले. इतके की आजही त्यांच्या नेत्रात श्रीसाईच्या मूर्तीचा ठसा कायम उमटलेला आहे. श्रीबाबांच्या बद्दलच्या कोणत्याही आणि कसल्याही गप्पासप्पा आणि आठवणी निघाल्या की काका त्यात रस घेतात आणि मग बोलता बोलता त्यांचा कंठ दाटून येतो आणि त्यांच्या डोळ्यातून आसू वाहू लागतात. अवस्थी-काकांनी बाबांनाच जवळून पाहिले आहे असे नव्हे तर बाबांच्या सभोवताली त्यावेळी वावरणाऱ्या, साईचरित्रामध्ये उल्लेख केलेल्या सर्व मंडळींनाही जवळून पाहिले आहे. नानासाहेब चांदोरकर, माधवराव देशपांडे उर्फ शामा, गोपाळराव बुटी, धुमाळ, दादासाहेब खापर्डे, दाभोळकर उर्फ हेमाडपंत, दासगणू महाराज, तात्या कोते पाटील, काकासाहेब महाजनी इत्यादींचे दर्शन तर त्यांनी हरहमेशा घेतलेले आहे. साईबाबा हे मराठवाड्यातील जालना जवळच्या सेलू या गावचे. ते स्वतः ब्राह्मण, ब्राह्मण माता पितरांच्या पोटचा त्यांचा जन्म. परंतु अतिशय लहान वयात त्यांचे आईवडील निवर्तल्याने त्यांचा सांभाळ एका फकीराने केला, त्यामुळे ते कफनी वेषधारी झाले. व्यंकुशा हे त्यांचे गुरु. बाबांनी भारतातील सर्व जाती बांधवांना एकत्र आण-ण्याचा खूप प्रयत्न केला. ते नाथपंथी होते म्हणून भक्ती मार्गाचा त्यांनी प्रचार केला. बाबा एखाद्यावर जर प्रसन्न झाले तर ते त्याच्याकडे दक्षिणा मागत असत. ते मराठी, हिंदी उर्दू या भाषा अस्खलित बोलत असत. बाबांची आरती त्यांच्या हयातीत त्यांचे भक्तगण

करू लागले याचे सारे श्रेय सुंदराबाई क्षीरसागर उर्फ राधाकृष्णामाई यांना आहे. त्यांनीच बाबांची आरती करण्याची प्रथा प्रथम पाडली व ती आजतागायत चालू आहे व त्याबद्दल आपणाला खरोखरीच संतोष व समाधान लाभते असे वयोवृद्ध भक्त श्री. काकासाहेब अवस्थी सांगतात. बाबांनी माणसांवर जसे प्रेम केले तसे गाई, कुत्री इ. प्राण्यांवर पण प्रेम केले. त्यांना फोटो काढणे पसंत नव्हते. त्यांना दगडावर बसलेले आपण कधीच पाहिले नाही, ते नेहमी द्वारकामाईत एका खांबाला टेकून बसत असत असे काका सांगतात.

श्री. अवस्थीकाकांचा विवाह मे १९१८ मध्ये झाला. त्यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई. त्यांना चार पुत्र व दोन कन्या एवढी अपत्यसंपदा लाभली. काकांचे थोरले चिरंजीव श्री. रघुनाथ सध्या मुंबईस असिस्टंट कमिशनर या पदावर असून श्री. सुभाष व श्री. शरद हे त्यानंतरचे दोघे चिरंजीवही पोलीस खात्यात मोठ्या अधिकाराच्या पदावर वावरत आहेत. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे फक्त अवस्थी काकाच साईभक्त आहेत असे नव्हे तर त्यांचे सारे पुत्र, कन्या व सूना या पण साई-भक्त आहेत. स्वतः काका साईनामाचे स्मरण करतात व दिवसभराचा वेळ धार्मिक आणि आध्यात्मिक साहित्य वाचनात घालवितात. त्यांचे ज्येष्ठ पुत्र श्री. रघुनाथजी तर श्रीसाईबाबांची दिवसातून दोनदा पूजा करतात.

# श्री साईलीला

स्. मा. गर्जे

१५ ऑगष्ट १९७४ चा दिवस संध्याकाळची वेळ. मद्रास शहरातील मैलापूर येथील श्रीसाईबाबा मंदीराच्या प्रांगणात आम्ही ५।६ जण गप्पा मारीत बसलो होतो. नारळाच्या एका उत्तुंग झाडाच्या बुंध्यालगत आराम खुर्चीमध्ये श्री. राधाकृष्ण स्वामीजी बसले होतें आणि आम्ही खाली वाळूवर आसनस्थ झालो होतो. हवेत गारवा होता, परंतु तो आल्हाददायक होता. मंद प्रकाशात श्री राधाकृष्णस्वामीजींची धीर-गंभीर, शांत व गौर वर्णीय चर्या व छातीवर रुळणारी शुभ्र दाढी पुरातन काळच्या ऋषीमुनींची आठवण करून देत होती. स्वामीजी बोलत होते, जणू खडीसाखरच विरघळत होती. वाणीत कमालीची मार्दवता व कथनाची पद्धतहि वाखाणण्यासारखी. स्वामीजी प्रत्येकाची आस्थेनें विचारपूस करीत होते. मद्रास – बेंगलोरची वार्ता सांगत होते. मधूनच गीतेतील एखादा श्लोक चर्चेच्या अनुषंगाने सांगत व मग रसाळ वाणीने सोप्या शब्दात अर्थ विषद करुन सांगत. स्वामीजींना मराठी येत नाही आणि हिंदी पण जेमतेम येते. त्यामुळे ते इंग्रजीत बोलत होते आणि ओघानेच त्याचे मराठीत भाषांतर करून आमच्या इतर साथीदारांना सांगण्याचे काम माझ्याकडे आले होते.

गप्पांच्या ओघात आम्ही श्रीसद्‌गुरु साईबाबांच्या बाबत बोललो नसतो, तरच नवल म्हणावे लागले असते, किंबहुना आमचे सर्व बोलणे श्रीसाईबाबांच्या विषयाला धरूनच होते, असे म्हणावे लागेल.

थोड्याशा कुतुहलाने आणि थोडेसे बिचकतच मी स्वामीजींना प्रश्न केला "स्वामीजी श्रीसद्‌गुरु बाबांचे तुम्हांस आलेले काही अनुभव सांगू शकाल काय?" "हो, आनंदाने!" स्वामीजी स्मित करीत उत्तरले आणि सांगू लागले.

"ही घटना बरीच जुनी आहे. त्या वेळेस मी शिर्डीला कार्यकारी मंडळात होतो. काकासाहेब दिक्षितांच्या वाड्यासमोर आमचे ऑफिस होते आणि ऑफिसला लागूनच काही खोल्या होत्या. त्या ठिकाणी आम्ही मंडळी रहात होतो.

एके दिवशी संध्याकाळी जेवण वगैरे उरकून आम्ही आपापल्या खोलीत झोपण्यासाठी गेलो. दिवसभराच्या कामामुळे त्या दिवशी मी खूप दमलेला, थकलेला होतो. अंथरुणावर पडताच मी निद्रादेवीच्या आधीन झालो. मला गाढ झोप लागली होती. मध्यरात्रीचा सुमार होता अन् अचानक मला जाग आली. समोरच्या खिडकीकडे माझी नजर गेली आणि आपण स्वप्नात तर नाही ना अशी शंका मनाला चाटून गेली, परंतु जे घडत होते, ते प्रत्यक्षात दिसत होते. श्रीसद्‌गुरु साईबाबा

खिडकीपाशी उभे राहून माझ्याकडे पहात होते. माझी त्यांची दृष्टादृष्ट होताच बाबा म्हणाले, "अरे, तू इथे का झोपलास? द्वारकामाईत जा." बाबा निघून गेले पण शब्द माझ्या कानात घुमू लागले. मी ताडकन उठलो व शेजारच्या झोपलेल्या माझ्या सहकाऱ्यांना उठविण्यास गेलो. त्यांना जागे केले व घडलेली सर्व हकिगत निवेदन केली. सहकारी म्हणाले, "विचार करीत कसले बसता, चला तर आपण सर्वजण द्वारकामाईत जाऊन बाबांची आज्ञा पाळू या. झालं, आम्ही तीनचार जण शाल, पांघरून हातात कंदील व काठी घेऊन निघालो. त्यावेळेस द्वारकामाईपर्यंत जाण्यासाठी नीट रस्ता पण नव्हता. आतासारखी त्यावेळेस रस्त्यावर लाईट पण नव्हती. थंडी पण कडाक्याची होती. दुरूनच पाहिले, द्वारकामाईपाशी एक मोटार उभी आहे. मनात थोडे चर्र झाले. अपरात्रीं या वेळेस इथे मोटार कशी? मनात शंकाचे काहूर माजले. आम्ही झपाझप पावल टाकीत द्वारकामाईत प्रवेश केला. पाहतो तो तिथे दोन इसम धुनीमधून बाबांची उदी पिशवीत भरून घेत आहेत. आम्हाला पाहताच दोघे गर्भगळीत झाले. बाबांची उदी चोरणाऱ्या या चोरांना पकडून आम्ही पोलीस पाटलाच्या स्वाधीन केले. त्यांच्यावर खटलाही भरला. ते केवळ उदी घेण्यासाठीच आले होते याची खात्री झाल्यावर व बाबांचा कौल घेऊन आम्ही नंतर सोडून दिले. कार्यकारी मंडळाची परवानगी घेतली असती तर हवी तेवढी उदी त्यांना आम्ही दिली असती. परंतु अशा प्रकारे उदी नेणे, ही मोठी चोरीच म्हणावे लागेल आणि बाबांनी योग्य वेळी मला जागे करून चोरांना पकडण्यास भाग पाडले." एवढे बोलून श्री. राधाकृष्ण स्वामीजींनी हात जोडले व म्हटले "श्रीसाईलीला अगाध आहे."

बाबांची कृपा असणाऱ्या स्वामीजींना मी साष्टांग प्रणिपात केला.

## साईनिकेतनमध्ये रामनवमी उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणेच ह्या वर्षीही रविवार दिनांक २०–४–७५ ला, साई-निकेतन ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर मुं. नं. १४ येथे सकाळी ९ ते १२-३० पर्यंत रामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. तत्समयी दहिसर येथील प्रसिद्ध साईभक्त श्री. बी. आर. काकडे ह्यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. तरी सर्व साईभक्तांनी ह्या संधीचा अवश्य लाभ घ्यावा अशी त्यांस विनंति आहे.

# ‘हृदयस्थ’

डॉ. के. भ. गव्हाणकर,


डॉ. के. भ. गव्हाणकर

‘वस्तुमात्रामध्ये नारायण निश्चितपणे कसा अनुभवावा,’ हा लेख ‘श्री साईलीला’ मासिक फेब्रुवारी १९७४ च्या अंकात वाचल्यानंतर, एका साईभक्ताने ‘सच्चिदानंद’ जर नारायण तर ‘हृदयस्थ’ म्हणजे काय व तो कुठे आहे? असा प्रश्न केला आहे. माझ्या अल्पमतीला व अनुभवाला जे पटते ते सर्वांकरिता प्रभुकृपेने खाली देत आहे.

हृदयस्थ म्हणजे काय याचा अर्थ नीट समजणे हे महत्त्वाचे आहे. कारण हा शब्द नेहमी अध्यात्मिक आणि इतर वाङ्मयात तसेच संभाषणात येत असतो. इंद्रिय विज्ञान शास्त्राप्रमाणे हृदय हा आमच्या शरीरातील अतिमहत्वाचा अवयव आहे.
याला रक्ताशय रक्तपिंड असेही म्हणतात. (Heart) या अवयवाच्या योगाने आपल्या शरिरातील रुधिराभिसरणाचे म्हणजे सर्व शरीरभर रक्त खेळविण्याचे काम चालते. या अवयवाचे म्हणजे हृदयाचे ठोके नाडीद्वारा ज्ञात होतात. आणि त्यायोगे हृदयाची म्हणजे शराराची कशी स्थिती आहे याचे ज्ञान होते, तेव्हा हृदय हा अवयव सर्वांच्या परिचयाचा आहे.

आता आध्यात्मिक ग्रंथात ‘हृदय’ हा शब्द कोणत्या अर्थी योजलेला आहे ते पाहू. हृदय याचा अर्थ धैर्य, मन, बुद्धि किंवा अंतःकरण असा घेतात. श्रीमद्भगवद्गीतेत हृदय हा शब्द बरेच वेळा आलेला आहे.

‘स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्। अ. १–१९ असे वर्णन आहे. याचा अर्थ असा की त्या (युद्धप्रारंभीच्या) तुंबळ शंखनादाने कौरवांची हृदये म्हणजे अंतःकरणे भेदून टाकिली असा आहे. तसेच पुढे अ २ यात–३–क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप आणि अ. ४।४२ हृत्स्थं ज्ञानासिनाऽऽत्मनः। असे वर्णन आहे. याचा अर्थ मनाचे दुबळेपणा किंवा ढिलेपणा टाकून आणि मनातील संशय छाटून टाकून असा आहे. पण यापुढे हृदय शब्द दुसऱ्या व्यापक अर्थी वापरलेला दिसतो. उदा. अ. ८।१२ मनो हृदि निरुध्य च। म्हणजे मन हृदयात कोंडून स्थिर करून आणि अ. १३।१७ ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते। ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम्। म्हणजे तेजाचेहि तेज ज्यास अंधरा (अज्ञाना) पलीकडचे म्हणतात. ज्ञान, ज्ञेय, ज्ञानगम्य असे ते

ब्रह्म सर्वांच्या हृदयात अधिष्ठित आहे. अ. ५।१५ यात 'सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो' म्हणजे मी सर्वांच्या हृदयात प्रविष्ट असलेला. अ. १८।६१ यात 'ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति'–ईश्वर सर्व भूतांच्या हृदयांत वास करितो इत्यादि.

हृदयाविषयींचे ज्ञानेश्वरीतील उल्लेख फार सुंदर व मननीय आहेत :—

(१) मज हृदयीं सद्गुरु । जेणे तारिलों हा संसार पुरू ॥ १–२२

(२) पतिव्रतेचे हृदय जैसे । पतीवाचूनि न स्पर्शे ॥ १–१११

(३) जैसा गजघंटा आत । सिंहलीला विदारित ।
तैसा ( घोष ) हृदयांते भेदित । कौरवांचिया ॥ १–१६३

(४) हृदयाचे ढिलेपण । एथ निकयासि नव्हे कारण ॥ २–२८

(५) जो आत्मबोधयुक्त । होऊनि असे सतत ।
जो मातें हृदया आंत । विसंबेना ॥ २-२१७

(६) अभ्यासची आपण यातें करी । हृदयांते अनुभव वरी ॥ ६-१६६

(७) विषयाचा विसर पडे । इंद्रियांची कसमस मोडे ।
मनाची घडी घडे । हृदयामाजी ॥ ६-१८८

(८) तरी मना बाहेरिलीकडे । येयाची साविया सवे मोडे ।
हें हृदयचिया होडी बुडे । तैसें कीजे । ८-१११

(९) तरी सहजे मन कोंडलें । हृदयींची असेल उगले ।
जैसें करचरणी मोडलें । परिवर न संडी ॥ ८-११३

(१०) तैसे हृदयामध्ये मी राम । असतां सर्व सुखाचा आराम ।
कां भ्रांतासी काम । विषयावरी ॥ ९-६०

(११) आतां इंद्रिया देऊनि कवाड । हृदयीं भोगी ॥ ९-१३५

(१२) तेव्हा मनासी मनपण न स्फुरे । बुद्धि आपणपें न सांवरे ।
इंद्रियाचे रश्मी माघारे । हृदयावरी भरले ॥ ११-१९१

(१३) जीव परमात्मा दोनी । बैसले एकासनीं ।
जयाचिया हृदयभुवनी । विराजती ॥ १२-१९३

(१४) श्री गुरुचे पाय । जे हृदय गवसूनि ठाय ॥ १३-५

(१५) का आघवियाचि इंद्रियवृत्ती । हृदयाचिया एकांतीं ।
थापटूनि सुषुप्ति । आणि जें गा । १३-१३०

(१६) आता हृदय हे आपुलें । चौफाळूनिया भलें ।
वरी बैसऊं पाउले । श्री गुरूची ॥ १५-१

(१७) येऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं । मी अमुका आहे ऐसी ।
जे बुद्धि स्फुरे अहर्निशी । ते वस्तु गा मी ॥ १५–४२१

(१८) सर्व भूतांच्या अंतरी । हृदय महा अंबरीं ।
चिदवृत्तीच्या सहस्रकरीं । उदयला असें गा ॥ १८-१२९९

इतके उतारे पुरे यातील आणि वरील गीतेतील उतारे पहाता हृदय हा शब्द एका मोठ्या व्यापक अर्थी वापरलेला दिसतो. तो अर्थ कोणता ते पाहू. डेक्कन कॉलेजातील शास्त्रीय विषयांचे सेवानिवृत्त प्रोफेसर म. स. दीक्षित, एम. ए. यांनी 'ज्ञानेश्वरीचे शास्त्रीय मंथन' नावाचे एक पुस्तक लिहीले आहे. त्यांत त्यांनी हृदय याचा अर्थ असा दिला आहे की—

हृदय या शब्दाचा रक्ताशय (Heart) असा अर्थ नसून, मेंदूच्या तळाकडील मानेतील भाग–मानेजवळील भाग. Little Brain की ज्याच्यापुढे पोकळी आहे · Fourth Ventricle असा घेतला पाहिजे. [पान ३३, ५२, ६४, ६६, ७३, ७८.]

शास्त्रीय विषयांवर उपयुक्त आणि मौलिक ग्रंथ लिहिणारे श्री. आनंदघनराम (रामचंद्र विनायक कुळकर्णी) हे आपल्या 'भयंकर संकटातून सुटण्याचे दोन मार्ग.' या छोट्या पुस्तकात (पान २) असे लिहितात—हृदयस्थ म्हणजे पुढच्या मेंदूच्या मध्यात राहून मागच्या मेंदूच्या द्वारे शरिरात सर्व ज्ञानाने व सामर्थ्याने क्रिया करीत आहे असा जो तो. या दोन्ही अर्थापेक्षा चांगला अर्थ. श्री रमण भगवान यांनी आपल्या 'रमण गीता' आणि 'रमणोपनिषद' (उपदेशसार) या ग्रंथांत सांगितला आहे.

अन्यदेव ततो रक्तपिंडाद्धृदयमुच्यते ।
अयं हृदिति वृत्त्या तदात्मनो रूपमीरितम् ॥ रमणगीता ५-५

अर्थ - हे (अध्यात्मिक) हृदय शरिरातील रक्तपिंडात्मक हृदयाहून निराळे आहे. येथे 'हृदय' (हृत् + अयं = हृदय हा अयं म्हणजे आत्मा.) या शब्दाच्या व्युत्पत्तीने आत्मरूप सांगितला आहे.

तस्य दक्षिणतो धाम हृत्पीठे नैव वामतः ।
तस्मात्प्रवहति ज्योति सहस्रतारं सुषुम्नया ॥ ५ - ६

अर्थ—त्याचे स्थान छातीच्या उजव्या बाजूस आहे. डाव्या बाजूस (रक्तपिंड आहे) तेथे नाही. तेथून ज्योति सुषुम्ना मार्गाने मस्तकांतील सहस्रदलकमलाकडे जाते.

'मी खात्रीने सांगतो, शपथेवर सांगतो' असे जोराने म्हणून मनुष्य छातीवर उजव्या बाजूकडे हात ठेवतो ती जागा हृदयाची. मानवाच्या सर्व वृत्ति जेथून उगम पावतात, त्याला हृदय असे म्हणतात. अहंवृत्ति ही सकल वृत्तीचे मूळ आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ही अहंवृत्ति जेथून उठते ते हृदय. 'हा मनोमय एकदेशी अहंकार नाश पावल्यावर शाश्वत व परमपूर्ण असा हृतस्वरुप अहंकार अहमहमिकेने मी, मी, म्हणून) स्फुरण पावू लागतो. (उपदेशसार श्लो. २०).

उपासना व्यक्त करताना उपास्य व उपासक यांची निश्चिती करणे हे सर्व प्रथम कार्य असते. भक्तीच्या भावनामय पण सर्वस्पर्शी उपासनेत सार्द्रता व सहृदयता अनुस्यूतच आहे.

उपासक परिवरात असा एक समज आहे की, उपासना त्रिविध आहे. ज्ञान, कर्म, व भक्ति, या रूपांनी तिचे अस्तित्व जाणतात. ज्ञान, क्रिया, इच्छा ( भावना ) या तीन शक्तींची देहांत, बुद्धि, मन व चित्त अशी त्रिविध स्थाने कल्पून बुद्धीने ज्ञान, मनानें कर्म व चित्ताने भक्ति अशा प्रकारे उपासनांगे मानण्यात येतात, पण हा समज भ्रांत आहे.

इच्छा, ज्ञान व क्रिया या तीन शक्ति ज्याच्या अंगभूत आहेत ते मूलतत्व ब्रह्म होय, त्यातूनच याची अवस्था प्रस्फुरित झाली आहे असा स्पष्ट उल्लेख ऋग्वेदात आहे. हिरण्यगर्भ–जीवात्मा याची उत्पत्ति या तीन शक्तींच्या व रजतमसत्व या गुणांच्या संयोगात घडते असे स्पष्ट केले आहे.

तिस्रो मातृस्त्रीन्पितृन्बिभ्रदेक ऊर्ध्वस्तथौ नेमव ग्लापयन्ति ।

मन्त्रयन्ते दिवो अमुष्य पृष्ठे विश्वविद वाचमिश्वमिन्वाम् ॥ ऋ. १.१६४.१०

यांना धारण करणारा हा एकटाच दिव्य पुत्र होय. हाच प्राणरूप हिरण्यगर्भ होय. या सर्व शक्ति मूळ ब्रह्मरूपिणी अदिति "इ" या शक्तिद्वारेच सूचीत आहे.

ही अदिती शक्ति ब्रह्मतेजाने विश्व प्रसवते. ती उन्मेषाभिमुख होते. अर्थात त्या मूळ ब्रह्म शक्तीचीच ही सर्व निर्मिती असल्यामुळे व ती स्वयमेव हृदयस्थ असल्यामुळे इच्छा, ज्ञान व क्रिया याद्वारे होणारी उपासना हृदयविहीन असणे शक्यच नाही. केवळ ज्ञातृत्व, कर्तृत्व, व भोक्तृत्व जीवनाच्या सर्व स्तरांवर होणारा विहार परिपूर्ण आहे असे नाही. ज्ञान, इच्छा व क्रिया स्वतंत्रेने अस्तित्वात राहू शकत नाहीत. म्हणूनच अध्यात्मशास्त्राने त्याच्या जोडीला 'अस्तित्व' नेऊन बसविले आहे.

अथर्ववेदात या संबंधी मोठा भावनापूर्ण प्रसंग आहे. अदिति–चिद्रूपा–प्राणरूपा शक्तीस इतर सर्व देवतांनी विचारले की, या जडदेहात चेतनात्मक रंग कोणी भरले. तेव्हा ती म्हणाली, 'मीच तो रंग भरला आहे.'

सर्व देवा अवशिक्षन् तज्जानाद्वधूः सती ।

ईशावाशस्य या जाया सास्मिन् वर्णमाभरत् ।

देहात सर्व चेतना उद्दीपित असणे हे कार्य प्रथम घडते व ऋत–नियम–प्रभाव या क्रमाने ब्रम्हजाया अदिति; ब्रम्हमयी सती हीच तेथे आपला प्रवेश करते. हीच आद्याशक्ति होय. श्वेताश्वेतरोपनिषदात हिलाच 'देवात्मशक्ति' म्हटले आहे.

ते ध्यानयोगानुगता अपश्यन्देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढाम् । श्वे. उ.१-३ ही आद्या' सत् मुळे सती, चित् मुळे चिती व आनंदामुळे आनंदमयी अशा रूपांनी देहात

असते. ती स्वांगभूत खालील्या देहात अवस्थित होते. योगशिखोपनिषदात तिलाच ' चिदात्मिका ' म्हणून गौरवते.

' नमोमस्यै नमस्तुभ्यं महाशक्त्यै चिदात्मने ।'

चंद्रमंडळांत तिचे आसन आहे. तीच 'चेतना' होय.

अंतःकरणचतुष्टयाची कल्पना याचमुळे मान्य झाली. ज्ञातृत्व कर्तृत्व व भोक्तृत्व एवढ्याने जीवन सचेतशील मानणे शक्य नाही. या साठीच शास्त्रांकारांनी ज्ञान, इच्छा, व क्रिया यांच्या जोडीला 'अहंकार' दर्शविला आहे. अहंकार हे मूळ अस्तित्व आहे. याच्याच आश्रयाने वरील तीन शक्तिबीजांचे प्रकट आविर्भाव बुद्धि, चित्त व मन रहातात. अंतःकरण ही परिव्यास व महत् आकाशाची अवस्था होय. किंबहुना यालाच 'हृदय' ही संज्ञा आहे. त्यामुळे स्वभावतःच या हृदयात मन, बुद्धि, चित्त व अहंकार जीवात्म्याचे स्फुरण म्हणूनच जाणावे लागतात. अर्थात् या स्फुरणाच्या मूळ उद्देशाला 'हृदय' ही संज्ञा आहे. हृदयानेच भक्ति-साधना संभवते. अंतःकरणाच्या संतत स्फुरणात प्रभुप्रेमाचे अभंग अल्हादन असेल तरच भक्तिची साधना होते. अर्थात अनेक उपासनांचे स्वतंत्र अधिष्ठान हृदय-सन्निद्ध असल्यामुळे हृदयनिष्ठ अशा भक्तीत त्या सर्व उपासना अव्यवस्थित आहेत असे सहजच कळू शकते.

'अहंकार' हे मानवी जीवनस्तरांवरील चेतनशील व्यापाराचे केंद्र आहे. म्हणूनच वरील तीन प्रवृत्ति या ' अहं ' प्रवृत्तिशिवाय संभवत नाहीत. अर्थात्, या चार प्रवृत्तीचेच अंतःकरण असते हे स्पष्ट होते. अहंकार म्हणजे अभिमान नव्हे– असा अर्थ घेऊ नये. ती सर्व द्रव्यात असणारी ' अमरज्योत ' आहे. अभिमान त्यातच निर्माण होत असला तरी तोहि 'ममत्व' या पदाने घडतो. त्याशिवाय 'अहं' हे पद असू शकत नाही हे येथे ध्यानात ठेवावे. ' ममत्वापूर्वीचे ' ' अहं ' येथे स्पष्ट आहे.

आता हृदयस्थ कोण ? तर ब्रम्हांडातील परिव्यास रश्मिनाथ देहात आत्मा म्हणून निवास करतो. अर्थात सविता उपासकांचे उपास्य आहे. हा सविताच जीवात्म्याचा सखा होय. अर्थात अंतरात्मा होय. या सवितारूप आत्मदेवासच 'निहितं गुहायाम्' म्हणजेच हृदयस्थ म्हटले आहे. प्रेरक व प्रकाशक ज्ञानात्मा तो सविता होय. सविता हे विष्णुतत्व आहे. आणि जीवन परिपूर्ण करण्यास साधकांना याच विष्णुतत्वाची मदत होते. याच्याच कृपेने साधकजन प्रकाशमान झाले. ह्या अध्यात्ममार्गाचा अवलंब करतात.

तद्विष्णोः परमं पदं पश्यन्ति सूरयः ।
दिवीव चक्षुराततम् ॥ ऋ १-२२-२०.यजु -६-५-अर्थव-७-२६-७

# मी मेडिकलला जाते

कु. संजिवनी प्रभाकर मुळे

गवयाच्या मुलाने गायक व्हावं, चांभाराच्या मुलाने चांभार, डॉक्टराच्या मुलाने डॉक्टर अन् मास्तराच्या मुलाने अर्थातच मास्तर. पण मी मात्र डॉक्टर व्हायची अपेक्षा बाळगली. नुसती इच्छा बाळगायला काय हरकत होती ? लहानपणापासून अभ्यासातील माझी प्रगती चांगली होती. पण मी डॉक्टर व्हावं असं मनापासून कोणाला वाटत नव्हतं. मुलींचं विश्व त्यांच्या दृष्टीने लग्न, संसार अन् मुलं ह्या चौकटीतलंच ! पण मी निश्चय केला होता. बाबांना मनापासून आळवत होते. मंदिरात जाताना माझं मन फक्त ह्या व अशाच विचारांनी व्यापलेलं असायचं. अंतर्यामात खळबळ माजलेली असायची. प्रिडिग्रीचे केवळ ६२% मार्कस् मनातील खळबळ वाढवतच होती. काय करावे समजत नव्हते. प्रवेश तर ७३% ला बंद होणार होता. मागील वर्षी तो ७२% बंद झाली होती. मी फक्त ऐकतच होते. केमिस्ट्रीचा पेपर फारच अवघड गेला होता. माझ्या मार्गात तो एक प्रचंड अडथळा होता.

दुसऱ्या दिवशी निकाल होता. मनाच्या दोलायमान अवस्थेत झोपी गेले. मध्यरात्री एकाएकी जाग आली, बघते तो माझ्या अंगावर एक छोटं फुल पडलं होतं. चमकून वर बघितलं. साईबाबांची हसरी मूर्ती जणू मला आशीर्वाद देत होती. पुन्हा झोपले. दुसऱ्या दिवशी उठले अन् धावतच कॉलेजात गेले. मैत्रिणींचा गराडा पडला. जो तो माझं अभिनंदन करू लागला. ७५% मार्कस् पडल्याने ॲडमिशन मिळण्याचे नक्कीच झालं होतं. बाबांनी प्रचिती दाखविली होती. छोट्या फुलाद्वारे आशीर्वादरूपाने माझं यशच सूचित केलं होतं. मी मनोमन आनंदले. मेडिकलला प्रवेश मिळवण्यासाठी मी जे श्रम घेतले होते, त्याचं सार्थकच झालं होतं. बाबांचे आशीर्वाद पाठीशी होते. त्यामुळेच तर मी एवढं यश मिळवलं होतं. शिखर दूर अजून फार लांब आहे. चढायला तर सुरुवात केली आहे. साईनाथ संस्थानने आर्थिक मदत देऊन बाबांच्या सेवेची जणू पावतीच दिली आहे. बाबांची प्रेरणा हेच माझ्या यशाचे स्फूर्तिस्थान आहे व राहील.

# ६. लपंडाव



लपंडाव हा एक लपालपवीचा खेळ आहे. यात व्यायाम जसा होतो तसेच बेमालूम कसे लपावे व लपलेले कसे हुडकून काढावे या कला माणसाला साध्य होतात. यात एकाला राज्य मिळते म्हणजे त्याच्यावर राज्य येते. राजाने लपलेल्यांना शोधून काढावयाचे. जो सापडेल त्याच्यावर राज्य येते. राज्य सारखे बदलत राहते. स्थिर नसते. जर कोणावर बराच वेळ ते स्थिर राहिले तर त्याला बावळट समजतात. अशी विक्षिप्त राज्यपद्धति या खेळात आहे. हा खेळ बैठा नसून चालता धावता आहे. म्हणून तो मोठ्या जागेत खेळतात. अडगळीच्या, खड्ड्याच्या, झाडी झुडपाच्या जागा उत्तम. त्यातही जंगल फारच चांगले आणि काळोखी रात्र उत्कृष्ट. रात्रीच्या वेळी काळोखात, जंगलात हा खेळ खेळल्याने फार फायदे होतात. कान, डोळे वगैरे इंद्रिये तीक्ष्ण होतात. धैर्य येते. असा खेळ हा वरच्या दर्जाचा समजतात. अशा खेळाचा वापर खेळाच्या महाविद्यालयात म्हणजे सैनिकी शिक्षणात करतात. लपंडाव सर्वांचा आवडता आहे. मुलांना तसेच मुलींनाही तो आवडतो. मुलांपेक्षा मुलींना अधिक. भावी संसारात लपंडावाचा त्यांना फार उपयोग होतो म्हणून की काय नकळे. तरुण म्हातारे व म्हातारे तरुण यांची या खेळाकडे विशेष ओढ असते. कारण लपविण्यासारखे त्यांच्याकडे पुष्कळ असते. लपणे व लपविणे या कला आहेत. त्या जन्मापासूनच येतात. तान्हं मूल आईच्या पदराखाली लपायला फार उत्सुक असते. व्यवहारात हरघडी आपण लपंडाव खेळत असतो. काही लपवीत असतो व दुसरा ते हुडकीत असतो. थापांच्या झाडाझुडपात लपणे व्यवहाराला फार मानवते. दांडी मारावयाची असली की बॉसला 'आजारी' कळवून आपण खुशाल सिनेमाला निघून जातो. यात बॉसवर राज्य येते व त्याला 'खरं' हुडकून काढावे लागते. संसारात पतिपत्नीच्या लपंडावात पुष्कळ वेळा पत्नीवर राज्य येते व तिला पतीच्या लपवाछपवी हुडकून काढाव्या लागतात. विद्यार्थी व शिक्षक यांच्या खेळात शिक्षकावर राज्य असून त्याला विद्यार्थ्यांच्या छपवाछपवी शोधाव्या लागतात. राजकीय मुत्सद्यात तर ओठावर एक तोंडात दुसरे व पोटात तिसरेच असा तिरंगी लपंडाव चालतो. पोटातील तोंडात व तोंडातील ओठावर न येऊ देण्याची कला त्यांना साध्य झालेली असते. असं वाटतं की सर्व राजकारणी लहानपणी लपंडाव खेळले असावेत, अर्थात सामान्य माणूस याला फारसा अपवाद नाही. तोही उजाडेपासून तो उजाडेपर्यंत आपआपल्यापरी लपंडाव खेळत असतो. हा दोष म्हणता यायचा नाही. हे जगच मुळी मायेचा लपंडाव आहे. तिने लपावे व लपवावे व आपण शोधावे. जीवनभर हेच. हा लपंडाव उत्कृष्ट रीतीने खेळावा हे अध्यात्म शिकल्याने समजते.

— द. शं. टिपणीस

# साईबाबांच्या धुनीचे महात्म

श्रीराम सातर्डेकर



श्रीसाईबाबांच्या जीवन चरित्रात धुनीचे महत्त्व आत्यंतिक आहे. शिरडी येथील आपल्या वास्तव्य-स्थानात (द्वारकामाईत) त्यांनी जी एकदा धुनी प्रज्वलीत केली ती त्यांच्या भक्तांनी अखंड प्रज्वलित स्वरूपात चालू ठेवली आहे. श्रीबाबांच्या कारकिर्दीत काय, किंवा त्यांच्या समाधी कालानंतर काय, तिचे भक्तसंकट निवारण कार्य अखंडीत चालूच आहे. त्याच धुनीतील उदीने आजवर असंख्य भक्तांचे रक्षण केले आहे. व त्यांना आशेचा किरण दाखविला आहे. यापुढील काळातही ते उदीरूपी कवच भक्तजनांचे संरक्षण करीत राहील यात शंकाच नाही.

श्रीबाबांनी द्वारकामाईत धुनी पेटविली व ती नंदादीपाप्रमाणे अखंड पेटती ठेविली. ती कशासाठी ? त्या धुनीच्या रूपाने त्यांना भक्तजनांची अंतःकरणे पेटवायची होती ! प्रत्येकाच्या अंतःकरणांत दिव्यत्वाचा अग्नी आहे. परंतु तो चेतवावा, पेटवावा लागत असतो. त्याशिवाय दिव्यत्वाची खूणगाठ पटत नाही. समर्थ रामदासांनी म्हटले आहे की, "वन्ही तो चेतवावारे। चेतवावाचि लागतो ॥" अंतःकरणांत अग्नी आहे.

तो सुषुप्तावस्थेतील अग्नी कोणी तरी चेतवावा लागतो. बाबांनी सतत पेटत्या धुनीच्या साहाय्याने ते कार्य घडवून आणिले आहे. ज्यांना डोळे आहेत त्यांनी पहावें व त्यापासून योग्य तो बोध घ्यावा.

अग्नी म्हणजे पेटता प्रकाश, जीवन-मात्र जगविण्याचे व त्यांचा संहार करण्याचेही सामर्थ्य त्याच्या ठायी आहे. अज्ञान अंधःकारात चाचपडत असलेल्या लोकांस "तमसो मा ज्योतिर्गमय" हा महान संदेश द्यावयाचा होता. आणि तो त्यांनी अखंड पेटत्या धुनीच्या रूपाने दिलेला आहे.

शिरडीत बाबांनी प्रवेश केला व सर्वत्र पसरलेला काळोख पाहून तो दूर करण्यासाठी त्यांनी जो पहिला-वहिला चमत्कार करून दाखविला; तो असंख्य पणत्या पेटवून द्वारकामाई तेजाळून सोडण्याचा ! या पणत्या पेटवाव्या, आणि त्यांच्या तेजाकडे तासन् तास त्यांनी डोळे भरून पाहत राहावे. या प्रकाशाचे मर्म त्यावेळी कोणाला ओळखता आले नाही. हा वेडा पीर भिक्षांदेही करून तेल जमवितो आणि पणत्या पेटवीत बसतो.

असे म्हणून त्यांची हेटाळणी करण्यात आली. लोक कुत्सीतपणे म्हणायचे "तुम्ही प्रकाश पाडता काय ! आम्ही तेल देतो म्हणून तुम्ही प्रकाश पाडता! आम्ही तेलच दिले नाही तर काय करणार तुम्ही ! आणि शिरडीतील दुकानदारांनी बाबांना तेल देण्याचे खरोखरच एके दिवशी नाकारले. परंतु बाबांनी ते त्यांचे अज्ञान ओळखून 'तेल नाही तर नाही' आपले पाणी आहे की नाही! पाण्याचे तेल बनवून प्रकाश पाडण्याचा बाणेदारपणा बाबांच्या ठायी होता. ते खोळंबून बसले

नाहीत. त्या दिवशी साऱ्या पणत्या पाण्याने भरल्या आणि द्वारकामाई नेहमीप्रमाणे झगझगीत प्रकाशाने तेजाळून सोडली. तेव्हा कुठे बाबांना तेल न देणारांचे डोळे उघडले व त्यांच्या अंतःकरणात चक्क प्रकाश पडला. तेव्हा शक्य त्या परीने बाबांना



लोकांच्या अंतकरणात प्रकाश पाडावयाचा होता. त्यांना दिव्यत्त्वाची जाणीव करून द्यावयाची होती. त्यांना चमत्कार करून दाखवण्याची हौस नव्हती. परंतु आपल्या सभोवतालची जनता जागवायची होती. चिखलात बुडलेल्यांना वर काढावयाचे होते. म्हणूनच ते प्रकाशाच्या मागे लागलेले होते.

बाबांची अखंड पेटती धुनी हीही त्याच प्रेमप्रकाशाची निशाणी आहे. त्या धुनीच्या दिप्तीने आमच्या ठायी काम, क्रोध, लोभ, मोह, मदमत्सरादी जे अंतःकरण व सारे जीवन काळवंडून सोडणारे अवगुण आहेत, त्यांच्यावर प्रकाश-किरण पडावे व आम्हाला आमच्याठायी असलेल्या दिव्यत्त्वाची जाणीव व्हावी, यासाठीच बाबांनी धगधगीत धुनीचा नंदादीप पेटविला. आमच्यासाठी आणि सर्व काळातील सर्व लोकांसाठी तो अखंड पेटत ठेविला आहे. "काळोखातून प्रकाशात या ! प्रकाशमान् व्हा ! इहपरलोकी आपले कल्याण करून घ्या," हा या धुनीचा सर्वांना संदेश आहे. धुनीतील राख म्हणजेच उदी ! साईबाबांचा 'कृपाप्रसाद' म्हणून या उदीचे माहात्म्य फार मोठे आहे ! उदीने रोग नाहीसे होतात. मनःशांतीही मिळते, असा अनुभव भाविकांना आलेला आहे. इहलोकीच्या सुखप्राप्तीसाठी जरी भक्तजनांची उदीवर श्रद्धा असली तरी या उदीच्या स्वरूपात एक महत्त्वाची गोष्ट आढळते ती म्हणजे ! हे सर्व जग नश्वर आहे. नाशिवंत आहे.

ईश्वर तत्त्वाची ओळख ! चराचरामधला ईश्वर पाहून तो सतत आठवते तेव-ढीच गोष्ट काय ती शाश्वत आहे. उदीमध्ये विश्वाचे ऐश्वर्य सामावलेलं आहे. म्हणून श्रद्धा आणि सबूरी ठेवूनच माझ्यासारखे (बाबांच्या कार्याचे गुणगान करणारे भाट) असंख्य साईप्रेमी बाबांच्या कृपाप्रसादामुळे आपले जीवन सुखाने कंठीत आहेत.

# श्री साईनाथ

## ( श्रीसद्गुरू साईमहाराज ललित-चरित्र )

** र. श्री. पुजारी, पुणे **



### ४३. आत्ता तो काऊ येईल आणि टोची मारून जाईल.

मशीद नेहमी माणसांनी भरलेली. भक्तांचा राबता तेथे कायम. तरीसुद्धा एका व्यक्तीविना गेले काही दिवस मशीद ओकी ओकी दिसू लागली. ती व्यक्ती म्हणजे भाऊ!

'भाऊ' हे नाव नव्हे. टोपणनाव! बाबांनी मोठ्या प्रेमाने दिलेले टोपणनाव. या टोपणनावाने बाबांनी भाऊला एक मनमोकळी हाक मारली की भक्तांनी समजावे—बाबांची स्वारी आज खुषीत आहे. वर जाण्यास काहीही हरकत नाही.

बाबांच्या प्रेमातील व्यक्ती अनेक. पण भाऊवरचे प्रेम काही न्यारेच. दुसऱ्या कोणालाही त्या प्रेमाची सर यायचीच नाही.

भाऊ आला की बाबांनी दिलखुलासपणे विचारावे, "काय भाऊ, कसे काय? सबकुछ ठीक? आबादीआबाद?"

भाऊनेही हसून दोन्ही हात वर करावे. नम्रपणे सुचित करावे, "बाबांच्या कृपेने सबकुछ आबादीआबाद आहे. कसलीही कमतरता नाही."

सकाळसंध्याकाळ भाऊ दर्शनाला येई. तेथे बाबांजवळ बसण्याची त्याची जागाही ठरलेली. जणू राखीव! ती जागा सोडून इतर भक्तांनी अन्यत्र कोठेही बसावे.

कठड्याजवळची जागा खास भाऊची. तेथे त्याने बसावे. बाबांशी मोठ्या प्रेमाच्या गोष्टी चालाव्यात. तासन् तास रंगाव्यात. इतर भक्तांनी भाऊच्या या भाग्याचा हेवा करावा. म्हणावे, "काय या पिल्ले डॉक्टराची पूर्वजन्मीची पुण्याई आहे समजत नाही. याच्याशिवाय बाबांचे पानही हलत नाही. चिलीम ओढताना भाऊ! विडी फुंकताना भाऊ! न्यायनिवाडा करताना भाऊ!—भाऊ! भाऊ!! भाऊ!!! या एका भाऊशिवाय जगात जणू कोणी भक्त नाहीतच!"

एक दिवस सभामंडपात बातमी आली—भाऊ आजारी आहे! अंथरूण धरले

आहे! पायाला नारू झाल्यामुळे झोपून आहे! पायाच्या ठणक्यासरशी अखंड नामस्मरण मुखाने चालू आहे—साई! साई!! साई!!!

सॉलिसिटर काकासाहेब दीक्षित, डॉ. पिळे यांचे निकटचे स्नेही. ते सकाळ-संध्याकाळ भाऊजवळ दिसू लागले. भाऊचे औषधपाणी, शुश्रुषा यांच्याकडे जातीने लक्ष पुरवू लागले. तरी भाऊच्या पायाचा ठणका कमी होईना. अंगातील ताप हटेना. उलट पाय गुरोळीसारखा सुजला. तो जमिनीस टेकताच प्राणांतिक वेदना होऊ लागल्या. लहान मुलासारखे रडू लागले.

एक दिवस भाऊ त्या प्राणांतिक वेदनांमुळे फारच टेकीस आले. काकासाहेब दीक्षितांना म्हणाले, "काकासाहेब, आता हे जगणे पुरे. बाबांना म्हणावे मला आता यातून लवकर सोडवा."

जाणतेपणी हातून कधी पाप घडले नाही. परपीडा दिली नाही. तरी हा भोग माझ्या मागे का? कशासाठी? काहीच कळत नाही.

काकासाहेब, भोग भोगल्याविना सुटका नाही. पुन्हा जन्म घेऊन तो भोगावा लागतो. माझ्या पूर्वजन्मीचाही हा काही भोग असेल. तो आनंदाने भोगेनही. पण ते दुःख सहन करण्याची शक्ती आता संपुष्टात आली.

आता बाबांकडे जाऊन, माझ्या वतीने त्यांच्या चरणी एवढीच प्रार्थना करा म्हणावे. "माझ्या पिंजऱ्याचे दार उघडा. हा पक्षी—प्राणपक्षी त्यामधून एकदा उडून गेला की सुटलो! पुढे दहा जन्म सुद्धा आनंदाने घेईन. या नरकयातनाही आनंदाने भोगेन. पण हे दुःख भोगण्यास मला आता लावू नका. अगदी सोसवेना हे दुःख."

भाऊच्या दुःखावस्थेचे हे वृत्त काकासाहेब दीक्षितांनी मशिदीत गेल्यावेळी बाबांच्या कानी घातले. तेव्हा बाबा म्हणाले, "त्याला सांग, म्हणावे, तू अगदी निर्भय राहा. कसलीही काळजी करू नकोस.

आणि हे बघ, आणखीही त्याला सांग: म्हणावे, तुझा दहा जन्मांचा भोग दहा दिवसात थोडा थोडा करुन मोकळा करू. मग झाले की नाही?

अरे! स्वार्थ, परमार्थ, मोक्ष—काय वाटेल ते त्याला द्यायला मी येथे समर्थ असताना म्हणावे, तू मरण का रे बाबा मागतोस! हेच काय शिकलास येथे येऊन!

जा! त्याला आणा येथेच. पाटुंगळीला घालून! म्हणजे सगळेच येथल्या येथे त्याच्याकडून करवून घेऊ. त्याला चुटकीसरशी मोकळा करवू! अरे, असे भोगाच्या भीतीने गांगरून जाऊन कोठे भागते काय!"

बाबांच्या आज्ञेचे पालन होण्यास काय उशीर! मी-तू करीत चार तगडी मंडळी वाड्याकडे धावली. डॉ. पिळे यांना पाटुंगळीला घातले. पाच मिनिटात आणवून बाबांसमोर हजर केले.

डॉक्टरांची म्हणजे आपल्या प्रिय भाऊची ही स्थिती पाहून बाबा क्षणभर कळवळले. आपल्या बसल्या जागेवरून बाजूस झाले. पाठीचा तक्क्या काढून भाऊला टेकायला दिला. म्हणाले, 'पड असा या तक्क्याला टेकून! नीट आरामात पड. संकोच करू नको. आजारी माणसाला संकोच कसला?"

आपल्या उजव्या हाताला बडेबाबा जेथे बसत, त्या ठराविक जागी भाऊला अशा रीतीने मोठ्या प्रेमाने बसवून घेऊन बाबा म्हणाले, "आता उगीच चिंता करू नकोस. पाय लांब करून स्वस्थ पडून राहा. आरामशीर पडून रहा. अरे, जे आपले पूर्वसंचित, ते कधी भोगल्याविना संपणार आहे काय? नाही ना? मग ते सुख काय आणि दुःख काय, विष काय आणि अमृत काय—त्याचा आनंद किंवा इतके तरी कशासाठी!"

"जे जे येईल, त्याला आपण पाठुंगळी घ्यावे. त्याचे ओझे तो मालिक-अल्ला-मालिक वाहील. चांगले–वाईट सर्व काही तो पाहून घेईल. त्याची काळजी आपण का करावी?

आपण नित्य त्याच्या चिंतनात मात्र राहावे. आपले चित्त–वित्त, काया–वाणी सर्व काही त्याच्या चरणी वाहावे. एवढे केले की आपले काम संपले! खरे की नाही?"

काही तरी बोलायचे म्हणून डॉ. पिळ्ळे म्हणाले, "नानासाहेब चांदोरकर म्हणाले, की पायावर घट्ट पट्टी बांधून ठेवा. म्हणून पट्टी बांधली. पण काहीच उपयोग झाला नाही."

एखाद्या अजाण मुलाची समजूत वडिलांनी काढावी तसे बाबा म्हणाले, "तो नाना एक पागल, आणि तू सात पागल! अज्ञाने फुकट मरशील! सोड ती पट्टी! आता तो काऊ येईल आणि टोची मारून जाईल! मग मात्र रडता रडता हसशील! म्हणशील : माझा पाय बरा झाला."

बाबांचे हे प्रेमळ बोलणे ऐकून भाऊला आईची आठवण आली. लहान वयात खेळताना गुडघे फोडून घेतले की ती असेच काही शब्द बोलायची, "आता काऊ येईल आणि तुझे दुःख बरे करून भुर्रकन् उडून जाईल!"

ते बोलणे त्या वयात खरे वाटायचे. त्या काऊची वाट पाहात आम्ही मुलांनी बसून राहायचे! तिला म्हणायचे, "अजून कसा तो काऊ आला नाही! सांग की!"

डॉ. पिळ्ळे अशा सुखद विचारात मग्न आहेत तोच सेवेकरी अबदुलभाई पणत्या लावण्यासाठी मशिदीत आला. त्याबरोबर किंचित लांब केलेला पाय डॉक्टरानी आवरता घेतला. मनाशी म्हणाले : आधीच येथे भक्तांची गर्दी. तशात मी पाय लांब केलेला. चुकून एखाद्याचा धक्का पायाला लागला तरी त्या वेदनानी माझा प्राण जायचा!

डॉक्टर त्या अबदुलभाईविषयी विचार करू लागले :

बाबा सर्वज्ञ. सर्वसाक्षी. दिक्कालातीत. काळाची गरज ध्यानी घेऊन ते देहधारी झाले. सर्वसामान्य मानवाप्रमाणे वर्तू लागले. हा आम्हा सुशिक्षितांचे समज या अज्ञ अबदुलभाईला कोठला? बाबांची अहोरात्र सेवा करावी एवढेच एक त्याला माहीत!

चावडीत रहावे. पडेल ते बाबांचे काम मोठ्या प्रेमाने दिवसभर करावे. रात्री कुराण पढावे. कधी कधी सबंध रात्रही पापणीस पापणी न लावता कुराणात बुडून जावे. मग ते कळो किंवा न कळो !

घरी नांदेडास बायको, आई, मुलगा. आई आणि मुलगा त्याला परत नेण्यासाठी अनेकदा येथे आले. बायकोही एकदा येऊन, त्याला घरी नेण्यासाठी सर्व विनवण्या करून अश्रूंचे अस्त्र सोडूनसुद्धा थकली. पण याचे मन विरघळले नाही. यत्किंचितही विचलित झाले नाही.

आईला अबदुलभाईच्या मुलाच्या म्हणजे आपल्या नातवाच्या लग्नाची काळजी फार. त्याचे लग्न तरी होईल की नाही असे तिला वाटे. एके ठिकाणी एक अगदी गरिबाची मुलगी पाहून नातवाचे लग्न जुळविण्याची तिने शिकस्त केली. पण तेथूनही मुलगी देण्यास नकारच मिळाला. दुःखावर डागणी म्हणून की काय, वर रोकडा जबाब मिळाला, " त्याचा बाप फकीर झाला आहे. फकिराच्या मुलाला आमची मुलगी आम्हाला द्यायची नाही. "

आपल्या दुःखी जीवनाचे गाऱ्हाणे बाबांच्या चरणी घालण्यासाठी ती माउली— अबदुलभाईची म्हातारी आई येथे आली. तेव्हा बाबा तिला म्हणाले, " सबुरी धर. घाबरू नको. मुलाला चांगली मुलगी मिळेल. स्थळ आपणहून येईल. लग्न आपोआप जमून येईल. "

पुढे ती आजी आणि नातू एका गावी गेले. तेथे एका कुटुंबवत्सल गृहस्थाची व त्यांची भेट झाली. त्याने त्या आजीला ' माझी मुलगी तुमच्या नातवासाठी करून घ्या ' अशी तिला गळ घातली. पण काही मंडळींनी ' मुलाचा बाप फकीर झाला आहे ' अशी बातमी त्याला देऊन लग्न मोडण्याचा प्रयत्नही केला. तेव्हा तो मुलीचा बाप आपण होऊन म्हणाला, " मीही फकीर झालो तरी हरकत नाही. माझी मुलगी मी या मुलालाच देणार. "

त्या गृहस्थाची एक मोठी मुलगी लग्नाची होती. तिचे लग्न जुळले होते. परंतु ते कार्य होण्यास अद्याप थोडा अवकाश होता. तरीही त्याने न थांबता धाकट्या मुलीचे लग्न अबदुलभाईच्या मुलाशी तातडतोब करून टाकले.

डॉ. पिल्ले स्वतःशी विचार करू लागले—

खरोखर, ज्याचे या मशिदीत एकदा पाऊल पडले त्याचा सर्व भार बाबांनी आपणावर घेतला ! मात्र तो या अबदुलभाईसारखा श्रद्धावंत भक्त पाहिजे. ती भक्ती, ती श्रद्धा, ती निष्ठा जोपर्यंत जवळ नाही तोपर्यंत कोणी कितीही सेवा केली तरी त्या सेवेला काय अर्थ ? ती सेवा नव्हे, ते पोषण ! स्वतःच्या अहंकाराचे ! मी बाबांचा सेवेकरी हे बिरुद जाईल त्याच्यापुढे मिरविण्याचे !

बाबांच्या जवळ बसल्या बसल्या डॉ. पिल्ले आजारीपणामुळे आपले वय विसरले. शिक्षण विसरले. मुलांहून मूल झाले. पायाची वेदना असह्य होऊन मधून मधून रडू लागले. मुलाने आईला विचारावे तसे बाबाना पुनः पुन्हा विचारू लागले,

" बाबा, सांगा की केव्हा येणार तो काऊ—टोची मारायला ? अजून कसा दिसत नाही तो ! "

बाबा हसून डॉ. पिळे यांना म्हणाले, " थोडा थांब. थोडी कळ काढ. आता येईल तो. येईल आणि टोची मारून जाईल. "

डॉ. पिळे लहान मुलाच्या अधीरतेने त्या काऊची वाट पाहात बसले. अब्दुलभाई पणत्या फडक्याने साफ करून त्यांच्यात तेल-वात करू लागला. त्या तेवू लागल्या. बाबा मात्र धुनीमाईकडे पाहात स्वतःशीच काही पुटपुटू लागले. जणू बाबा या वेळी काही वेदमंत्र म्हणत होते. अभीष्ट चिंतीत होते.

## ४४. हे व्याधिनाशन म्हणजे हरिभजनी चिकटविण्याची युक्ती तर नव्हे !

डॉ. पिळे यांच्या समोर बसून माधवराव एकीकडे त्यांची हतबल अवस्था पाहात होते. दुसरीकडे स्वतःशी विचार करीत होते; बाबा मला म्हणाले तो ' काऊ ' म्हणजे काय असेल बरे ? मला साप चावल्यावेळी बाबा मला ' भटुरड्या ' असे म्हणाले. तसा तर हा काही प्रकार नसावा ! दुसऱ्या कशास उद्देशून तर त्यांनी ' काऊ ' हा शब्द वापरला नसेल !

डॉ. पिळे यांचे विव्हळणे, रडणे पाहाता पाहाता माधवरावांना जुन्नर तालुक्यातील नारायणगावच्या त्या भिमाजी पाटलाची आठवण आली. भिमाजी पाटलांना कफक्षय झाला होता. ताप, खोकला, मळमळणे, रक्ताच्या गुळण्या येणे, असे प्रकार सुरू होते. त्यामुळे अन्न-पाणी वर्ज होते. बिछान्याला खिळले होते. औषधपाणी, पेजपथ्य कुचकामी ठरल्यामुळे दिवसेंदिवस झिजत चालले होते.

डॉक्टरी, दैवी—सर्व उपचार करून थकल्यानंतर भिमाजी पाटील येथे आले. नानासाहेब चांदोरकरांनी त्यांना येथे आणले.

त्या दिवशी मशिदीच्या या चौकारोजारी पुढच्या दारापर्यंत गाडी आणली. दोघांनी दोन बगलेत, दुसऱ्या दोघांनी दोन गुडघ्याखाली हात घालून फुलासारखे अलगद उचलून त्यांना येथे — मी बसलो आहे याच जागी आणून ठेवले. नानासाहेबांनी आधी सांगून ठेवल्याप्रमाणे पाटलांविषयी भीत भीतच मी बाबांकडे सूतोवाच केले. म्हणालो, " बाबा, हे नारायणगावचे भिमाजी पाटील... "

माझे वाक्य पुरे होण्याआधीच बाबा माझ्यावर रागावले. माझ्यावर ओरडून म्हणाले, " शाम्या ! हे कोण कोठले चोर आणून माझ्या अंगावर घालतोस ! हे शोभते का तुझ्यासारख्याला ! "

बाबांचा हा आवेश पाहून तो बिचारा पाटील घाबरून गेला. बाबांचे पाय घट्ट धरून त्यांच्यावर माथा टेकविला. काकुळती येऊन दीनपणे म्हणू लागला, " देवा, अनाथाचा सांभाळ. त्यांचे अपराध पोटी घालून आपण मायबाप करणार नाही तर मी कोठे जाऊ ? कोणाकडे तोंड पसरू ! "

भिमाजीचे हे करुण, आर्त शब्द ऐकून हा दयेचा सागर हेलावला. म्हणाला, "आता कोठेही जाऊ नको. कसलीही खंत करू नको. या माझ्या शिरडीच्या हद्दीत तुझा एकदा पाय पडला ना ? मग आता तुझ्या भोगाचा समूळ नाश झाला असे समज.

अरे, या मशीदभाईची पायरी जो एकदा चढला, त्याला काय तो दयाळू फकीर असा टाकील ?

आता असे कर. भिमाबाई म्हणून एकजण येथे आहे. तिच्या घरी जा. तेथे एक दोन दिवस मुकाम कर — की ताप, खोकला, अशक्तपणा जे काही असेल ते पळून जाईल !"

बाबांच्या मुखीचे हे शब्द ऐकून त्या भिमाजीला आपला पुनर्जन्म झाल्यासारखे वाटले. एक तासभर मोठ्या प्रसन्न मनाने बाबांसमोर बसून राहिला. आणि काय आश्चर्य, दर पाच मिनिटांनी घशाशी येणारी रक्ताची गुळणी अजिबात थांबली ! जणू रक्तक्षयाचा तो भयंकर विकार त्याला कधी होता की नव्हता !

इतक्या दूरचे उदाहरण कशाला ! या शिरडी गावच्या बाळा शिंप्याची गोष्ट.

बाळा शिंपी थंडीतापाने अगदी हैराण झाला. बाबांकडे येऊन रडत बसला. म्हणाला, "बाबा, हातून काय पाप घडले कळत नाही. पण हा ताप काही मला सोडीना ! जसा मला घेऊन जायलाच आला आहे ! औषधे, काढे माती आणि मसण ! सर्व केले. पण याचे पाऊल पुढेच ! मागे म्हणून नाही !"

त्या सज्जन, भाविक, सरळमार्गी बाळा शिंप्याची बाबांना दया आली. म्हणाले, "हे बघ, थोडा दहीभात कालवून एका पत्रावळीवर घे. लक्ष्मी आईच्या देवळाजवळ जा. तेथे एक काळे कुत्रे येईल. त्याला तेवढा खाऊ घाल की तुझा थंडीताप पळाला !"

बाळा शिंप्याने बाबांनी सांगितले ते सर्व श्रद्धेने केले. आणि काय आश्चर्य, त्या दिवसापासून तो जुनाट, हेकट थंडीताप त्याला सोडून कायमचा पळाला !

श्रीमंत बापुसाहेब बुटींच्याही पोटात अशीच थंडी झाली होती. जुलाब–उलट्यांनी हैराण झाले होते. कपाट औषधांनी भरलेले. पण त्यातील एकही औषध लागू पडेना ! त्यामुळे शक्ती क्षीण झाली. नित्यनेमाने बाबांचे दर्शन घेण्यास जाण्यापुरतेसुद्धा त्राण अंगात उरले नाही. हताश होऊन म्हणू लागले, "या आजाराचे लक्षण मला काही ठीक दिसत नाही."

बुटींचे निराशेचे हे उद्गार बाबांच्या कानी गेले मात्र, बाबा म्हणाले, "असेल तसा त्याला आणून माझ्या पुढे बसवा."

मग काही मंडळींनी त्यांना उचलून आणून येथे बाबांसमोर बसविले. बाबा त्यांना म्हणाले, "खबरदार पुन्हा शौचाला जाशील तर ! सांगितले नाही म्हणशील ! आणि बांती तरी पुन्हा कशी होते ते बघतो !"

तर्जनी हलवून निग्रहाने बाबा एवढे बोलले मात्र—त्या दोन्ही व्याधींनी तेथल्या तेथे बाबांची भीती घेतली ! पुन्हा म्हणून बुटींना उपद्रव केला नाही. साहजिकच बापुसाहेब बुटींच्या प्रकृतीला त्या क्षणापासून आराम पडला.

असो. पुढे एकदा याच बापुसाहेब बुटींना पटकी झाली. रेच, वांत्या यांनी जीव टेकीस आला. तहान तहान होऊन तहानेने घशाला शोष पडला. सारखे पाणी मागू लागले.

हेच डॉक्टर पिल्ले त्यावेळी त्यांच्याजवळ अहोरात्र बसून होते. त्यांनी आपल्या डॉक्टरी शास्त्रानुसार सर्व उपाय योजले. पण कोणताही उपाय लागू पडेना. शेवटी डॉक्टरही घाबरले. त्यांनी बाबांकडे धाव घेतली होती. ती सर्व परिस्थिती जशीच्या तशी निवेदन केली. ती ऐकून घेऊन बाबा त्यांना म्हणाले, "कॉफी देऊ का पाणी चांगले म्हणून मला काय विचारतोस ? बदाम-पिस्ते-आक्रोड घालून, चांगले आटवून आटवून ते दूध दे त्याला ! म्हणजे त्याची ती तहानही राहील आणि रेच, वांत्या वगैरेही सर्व तात्काळ बंद होईल."

हाच—अगदी हाच उपाय बाबांनी काकासाहेब महाजनींच्याही बाबतीत एकदा उपयोगात आणला होता.

सभामंडपाची फरशी करण्याचे काम त्यावेळी सुरू होते. त्याच्या आधी आठ दिवसांची गोष्ट. काकासाहेबांना अकस्मात जुलाब होऊ लागले. परंतु औषधोपचार करीनात. बाबांवर भार घालून स्वस्थ राहिले. मनाशी म्हणाले: जेव्हा बाबा स्वतःहून या व्याधीचे निवारण करतील तेव्हा करोत. मी मात्र एवढेच पाहीन की बाबांच्या पूजेत किंवा आरतीत माझ्याकडून खंड पडू नये.

ज्या दिवशी फरशी करण्याची आज्ञा मिळाली त्या दिवशी बाबा तात्याबांना म्हणाले, "मी लेंडीवर चाललो आहे. तिकडून परत आल्यावर फरशीच्या कामास तुम्ही सुरुवात करा."

बाबा लेंडीवरून परत आले. आपल्या गादीवर जाऊन बसले. काका पुढे झाले. चरणावर मस्तक ठेवून बाबांचे पाय चेपू लागले.

एवढ्यात कोपरगावावरून टांगे येऊन थडकले. मुंबईकडील—

## महायोगी अरविंदांची भविष्यवाणी.

महान योगी अरविंद हे एक साक्षात्कारी पुरुषोत्तम होते. त्यांच्या भाषेत म्हणायचे तर महामानव होते. त्यांचा योगमार्ग समजण्याला कठीणतर आहे आणि यदाकदाचित तो एकाद्याला आकलन झाला तर त्याच्या हातून तसे आचरण होणे महा कर्म कठीण. पण स्वतः अरविंद बाबूंनी खडतर तपश्चर्या करून आपल्या योग-मार्गात अद्वितीय स्थान मिळविले होते ही निर्विवाद गोष्ट आहे. त्यांना त्यांच्या योगाभ्यासाने अतींद्रीय दृष्टीलाभ झाला होता. आणि त्यामुळे त्यांना भविष्य काळा-तील काही घटनांचे ज्ञान अगोदर होत होते. उदाहरणच द्यायचे झाले तर भारताला स्वातंत्र्य मिळणार आहे.

हे भविष्य त्यांनी आपल्या मित्रांजवळ आणि अनुयायांजवळ कितीतरी अगोदर प्रसंगोपात सांगितले होते. हे भविष्य खरे ठरलेले आपण अनुभवतोच. त्यांची अशीच दुसरी दोन चार भविष्ये आपणाला स्फूर्ती देणारी व आनंद देणारी आहेत, तेवढीच येथे देत आहे.

(१) मानव जातीचे भवितव्य उज्ज्वल आहे.

(२) मानवाचे अपूर्णत्व संपेल, आणि पूर्ण मानव, आदर्श समाजरचनेचा पाया घालील.

(३) भारतीयांचा अध्यात्म विचार युरोप व अमेरिकेत मान्यता पावेल आणि त्यामुळे आंतर–राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित होईल.

(४) आज खंडीत असलेला भारत उद्या एकसंघ होईल.

ही झाली एका दिवंगत साक्षात्कारी महामानवाची भविष्यवाणी. आता ऐका एका विद्यमान साक्षात्कारी पुरुषोत्तमाची भविष्यवाणी, हे आहेत परम कृष्णभक्त, भक्तीयोगी माजी न्यायमूर्ती राम केशव रानडे. हे आपल्या एका प्रवचनात सांगतात,

‘ भारत विज्ञानरूपी दूध आटवून त्यात आध्यात्मविद्येची साखर घालून व त्यात मानवतेचे केशर मिसळून बासुंदी तयार करील व सर्व जगाचा आत्मा तृप्त करील. साहजिकच सर्व जगाचा भारत देश मेरूमणी व शिरोमणी होईल.

अशा या प्रेरणादायी भविष्याचा जयजयकार परमपूज्य विनोबांच्या भाषेत करू या.

बोला ‘जय जगत’ जय भारत, जय महाराष्ट्र,

—बाळकृष्ण सदाशिव धामणकर

# मत्स्य भगवानांचा जन्म!

चैत्र शु. २ या दिवशी मत्स्य भगवानांचा जन्म झाला. दशावतारांतील हा पहिला अवतार होय.

दुष्टांचा संहार व सज्जनांचे रक्षण करून धर्मसंस्थापनेसाठी परमेश्वर अवतार घेत असतो. मत्स्यावतार हा पहिला अवतार होय. पंचविसाव्या कल्पाशेवटी ब्रह्मदेवाची रात्र सुरू झाली; व सर्वत्र प्रलयकाळ सुरू होऊन स्वर्ग, पृथ्वी ३-सर्व लोक बुडून गेले. सर्वत्र अधर्माचरण माजून अंदाधुंदी सुरू झाली. ब्रह्मदेव निद्रिस्त असतांना त्यांच्या मुखातून जे वेद बाहेर पडले ते हयग्रीवाने पळविले. त्याचा संहार करण्यासाठी भगवान श्री विष्णूंनी मत्स्यावतार धारण केला.

यावेळी सत्यव्रत हा पृथ्वीपती होता. हा तपस्वी राजा एकदा कृतमलिन स्नान करून तर्पण करीत असता त्याच्या ओंजळीत एक मत्स्य आला. राजा त्यास फेकणार तों तो मत्स्य म्हणाला, "राजा, माझे रक्षण कर." त्यास आपल्या कमंडलूत घालून राजा घरी परतला. पण घरी येताच त्या मत्स्याचा देह वाढू लागला. कमंडलूतून विहीर, सरोवरातही तो मावेनासा झाला. तेव्हा राजाने चकित होऊन विचारले, "मत्स्यरूपाने मला मोहित करणारा तू कोण आहेस?" त्यावरून मत्स्य भगवान प्रसन्न होऊन बोलले, "आजपासून सातव्या दिवशी प्रलयकाल होईल त्यावेळी मी एक नौका पाठवीन. त्यावेळी तू व सप्तर्षी त्या नौकेत बसा." मत्स्य लुप्त झाला व बरोबर सप्तदिनी सागर एकाएकी वाढून सर्व धरतीमाता जलशयात बुडून गेली. ठरल्याप्रमाणे सत्यव्रतास पाण्यात एक नाव दिसली. तीवर तो सप्तर्षींसह चढला. त्या राजाने भगवान-मत्स्याची स्तुती केली. प्रलयकालाच्या शेवटी मत्स्याने हयग्रीव दैत्याला मारले व त्यापासून वेद घेऊन ते ब्रह्मदेवाला देऊन टाकले. सत्यव्रत राजाला जे ज्ञान मत्स्य भगवानांनी दिले आहे ते मत्स्यपुराणात सापडते. हिंदु संस्कृतीतील मत्स्यकूर्मादि अवतार उत्क्रांतिशास्त्राला धरून आहेत.

—सुभाषचंद्र

# ज्योतिषशास्त्राचा ओनामा

## लेखांक ८ वा

लेखक—होरालंकार शं. वा. देवधर, दादर, मुंबई.

[ गुरु पुढे चालू ]

(७) जन्मकुंडलीमध्ये सप्तमस्थानी गुरु असेल तर विवाहाच्या दृष्टीने तो भाग्याचा योग समजावा. विवाहाचा जोडीदार सुस्वभावी व सद्‌गुणी मिळेल. व विवाहसौख्य चांगले मिळेल. विवाहापासून भाग्योदय होईल. संसारामध्ये खरे प्रेम व शांतता राहील. गुरु - शुक्र, गुरु - रवि, गुरु - चंद्र या युती फार उत्तम परंतु गुरु - शनि, गुरु - मंगळ, गुरु - राहू व गुरु - केतु ह्या युती अनिष्ट आहेत. त्यामुळे विवाह उशीरा व वैवाहिक सौख्य समाधानकारक मिळत नाही.

भागीदारी धंद्यात हा गुरु अनुकूल असतो. जुन्या पुस्तकात सप्तमातला गुरु पुत्रचिंता निर्माण करतो असे सांगितले आहे.

(८) जन्मकुंडलीमध्ये अष्टमस्थानी गुरु असेल तर सांपत्तिक स्थिती समाधानकारक राहणार नाही. फक्त मेष, सिंह, धनु या राशीत असेल तर आर्थिक-दृष्ट्या तो चांगला असतो. ह्या गुरुमुळे आयुष्ययोग चांगला असतो. येथे गुरु बलवान असेल तर या ना त्या रूपाने स्त्रीधन प्राप्त होईल. लॉटरीत पैसा मिळेल. वडिलोपार्जित किंवा मृत्युपत्राने इस्टेट मिळेल.

(९) जन्मकुंडलीत नवम स्थानी गुरु असेल तर अत्यंत महत्वाचा आहे. कारण नवमस्थान हे भाग्यस्थान आहे. पुष्कळ मोठ्या लोकांच्या कुंडलीत नवमस्थानी गुरु किंवा गुरु–चंद्र असता ते लोक फार प्रसिद्ध होतात, मंत्री, दिवाण, मुत्सदी, किंवा श्रीमान लोक या योगावर जन्माला येतात. भाग्यस्थानी कर्क राशीचा गुरु असता परदेशगमन घडते. गुरु चंद्र, गुरु–शुक्र गुरु–रवि ह्या युति मनुष्याला कीर्तिमान, विद्वान, ग्रंथकार इ. कारणांनी प्रसीध्दी देतात. गुरु–शनि-गुरु–मंगळ, गुरु–राहु युति असतील तर दर्जा कमी राहून त्यांमध्ये प्रसिद्धी मिळेल. त्यांची विचारशक्ति कमी असेल. बहुधा प्राध्यापक, शास्त्री, शिक्षक यांचे कुंडलीत गुरु नवम स्थानी आढळून येतो. परंतु तो अशुभ ग्रहांच्या दृष्टीत असतो.

( १० ) जन्मकुंडलीमध्ये दशमस्थानी गुरु असेल तर तो यश देणारा असतो. कोणत्याहि धंद्यात अगर नोकरीत कीर्ती व धन ही प्राप्त होतात. ह्या गुरूचे फार महत्व आहे. चांगल्या राशीतला गुरू दशमस्थानात असता वडिलांपासून सौख्य चांगले मिळते. वृश्चिक राशीत गुरू असेल तर वैद्यकीय धंद्यात व सायन्समध्ये

यशस्वी होतो. असे लोक उच्चपदावर असतात. उमरही चांगले असते. आरंभी लहान नोकरी असली तरीही पुढे अधिकारपद प्राप्त होते. जनतेची सेवा व नेतृत्व या बाबतीतही हा गुरू लाभदायक ठरतो.

(११) जन्मकुंडलीमध्ये एकादशस्थानी गुरु असेल तर ते लाभस्थान असल्या-मुळे सन्मान, कीर्ती व भाग्यदायक अशा घटना घडतील. संततीच्या बाबतीत हा गुरु अत्यंत अनुकूल आहे. वडिलाना मान देणारी मुले निपजतात. चांगल्या लोकांशी मैत्री जमते. अनेक प्रकारचे लाभ होतात. आशा व आकांक्षा तृप्त होतात. परंतु हा गुरु मंगळानें बिघडलेला असल्यास बापाला न जुमानणारी मुले निपजतात. त्यांचेपासून दुःख व असमाधान प्राप्त होते. मित्र अविचारी मिळतात. आर्थिक अडचणी येतात. गुरु - शनि असल्यास पुष्कळ परिश्रमानें यश प्राप्त होईल. गुरु - हर्पल हा योगमात्र भरभराट करणारा आहे.

(१२) जन्मकुंडलीमध्ये द्वादशस्थानी गुरु असेल तर बहुधा सरकारी नोकरी करावी लागते. ह्या स्थानी असलेला गुरु आध्यात्मिक ज्ञानाची आवड उत्पन्न करील. पैसा अनाठायी खर्च होईल. मैत्रीला योग्य माणसे मिळणार नाहीत. हा गुरु पाप-ग्रहांच्या युतीत असल्यास कर्जबाजारी होईल. व्यापार धंद्यात अपयश येईल. अवि-चाराने पैसा खर्च होईल.

## शुक्र

१ जन्मकुंडलीमध्ये लग्नी शुक्र असता सौंदर्याचा कारक असल्यामुळे शरीर सुंदर व चेहरा आकर्षक असतो. त्याला ललित कला, रंगेलपणा, मौज, मजा, आनंद यांची आवड असते. चेहऱ्यावर बहुधा बुध्दीची चमक असते. आनंदी व गोड स्वभाव असतो. भुवया निटनेटक्या व रेखीव असतात. त्यांना विनोद, नाट्य, संगीत आदी कलांची आवड असते. शुक्र–शनि युति फार चांगली. शुक्र–मंगळ असेल तर नटवेपणा व दिखाऊपणा जास्त असेल व बहुधा प्रेमविवाह होईल. शुक्र - राहू युती असेल तर विजातीय विवाह होईल. शुक्र - बुध आवाज उत्तम.

(२) जन्मकुंडलीमध्ये द्वितीयस्थानी शुक्र असेल तर सांपत्तिक स्थिती नेहमी अनुकूल राहील. जन्म सुखवस्तु घराण्यात झालेला असेल. त्याला पैसा कधीही कमी पडणार नाही. पण मंगळ, हर्पल, शनि यांची अशुभ दृष्टी असेल तर हातात पैसा राहाणार नाही. हा शुक्र कर्णमधुर आवाज देईल. जर शुक्र - रवि युती असेल तर दृष्टीवर वाईट परिणाम होईल.

(३) जन्मकुंडलीमध्ये तृतीय स्थानी शुक्र असेल तर हस्ताक्षर उत्तम असेल ड्रॉइंग, पेंटींग, फोटोग्राफी यांची आवड, नातेवाईकांकडून सौख्य व बंधु-भगिनींचे प्रेम प्राप्त होईल. बुध - शुक्र, गुरु - शुक्र, रवि - शुक्र असतील तर वरील परिणाम

स्पष्ट दिसून येतील. चंद्र - शुक्र असेल तर पुष्कळ लहान लहान प्रवास घडतील.

(४) जन्मकुंडलीमध्ये चतुर्थ स्थानी शुक्र असेल तर हे फार चांगले लक्षण आहे. सुखी व समाधानी जीवन, राहण्यास चांगली जागा व मातृसौख्य ह्या दृष्टीने हा शुक्र उत्तम असतो. आयुष्याचा उत्तरार्ध सुखासमाधानात जातो. हाती घेतलेल्या कामामध्ये यश प्राप्त होईल. शुक्र–राहू, शुक्र-शनि, शुक्र–चंद्र शुक्र-रवि हे सर्व भाग्यकारक योग आहेत. एकंदरीत चतुर्थ स्थानी शुक्र असणे हा कुंडलीतील चांगला योग समजला जातो.

(५) जन्मकुंडलीमध्ये पंचम स्थानी शुक्र असेल तर मनुष्य चैनी व सुखलोलुप असतो. नाटक, सिनेमा, गाणी, नृत्य वगैरे विषयांची आवड असते. या शुक्रावर शुभग्रहाची दृष्टी असेल तर लॉटरी, रेस, वगैरे अचानक द्रव्यलाभ होतात. पंचमस्थानी शुक्र असलेल्या मुलींना स्थळे चांगली मिळतात. त्यांना देवीची उपासना आवडते. ह्या शुक्रावर हर्षल, रवि, यांची दृष्टी असेल तर अशा मुली प्रेमात फसतात त्या कधीहीं सुधारत नाहीत. शुक्र पंचम स्थानी असलेला विद्यार्थी हुषार असूनही अभ्यासाकडे लक्ष देत नाहीत. शेवटी जेमतेम पास होतात. शुक्र-गुरू, शुक्र–बुध शुक्र-रवि असेल तर हे विद्येच्या कामी अपूर्व यश देतात.

(६) जन्मकुंडलीमध्ये षष्ठमस्थानी शुक्र असेल तर नोकर चांगले मिळतात. ह्या शुक्रामुळे खाण्याकडे प्रवृत्ती जास्त असते. व त्यामुळे आरोग्य बिघडते. कर्क, वृश्चिक, मीन या राशीत शुक्र असेल तर बहुधा दारू पिण्याचे व्यसन असते. किंवा कोणते तरी व्यसन असतेच. शनि, हर्षल याची अशुभ दृष्टी असेल तर उपदंशासारखे भयंकर विकार होतात. गुरू–शुक्र, चंद्र–शुक्र, रवि–शुक्र, शनि–शुक्र हे शुभ योग असतील तर माणूस नोकरी धंद्याचे बाबतीत सुखी होतो.

(७) जन्मकुंडलीमध्ये सप्तमस्थानात शुक्र असेल तर विवाहसौख्य चांगले मिळते. हा शुक्र शुभ राशीत असेल तर विवाहानंतर भाग्योदय होईल. त्याला स्त्रीधन मिळेल. वृषभ, तूळ व मीन या राशीत शुक्र भाग्योदयकारक होतो. त्यांचे वैवाहिक - जीवन सुखावह होते. शुक्र - बुध, शुक्र - रवि, शुक्र - चंद्र या स्थानात चांगले फळ देतो. शुक्र - मंगळ मात्र स्त्रियांच्या कुंडलीत चांगला नाही. शुक्र सप्तमात असता १९ व्या वर्षी विवाह होतो. ह्या लोकांना कमी श्रमांत नेहमी जास्त फायदा होतो. शुक्र - हर्षल व शुक्र - केतु हे योग विवाहसौख्याला चांगले नाहीत.

(८) जन्मकुंडलीमध्ये अष्टम स्थानी शुक्र असेल तर विवाहानंतर त्या मनुष्यांचा भाग्योदय होईल. या शुक्रावर रवि, चंद्र यांचा शुभ योग असेल किंवा शुक्र, वृषभ, तूळ, मीन या राशीत असेल तर लॉटरीत बक्षिस मिळेल.. गुप्तधन

मिळू शकेल. शुक्र, मंगळ, अष्टमस्थानी असतांना किंवा शुक्र बिघडला असतांना मधुमेह व मूत्रपिंडांचे विकार बळवतात.

९ जन्मकुंडलीमध्ये नवमस्थानी शुक्र असणे हा भाग्याचा योग आहे. विद्या व्यासंग व धार्मिक प्रवृत्ति दिसून येईल. लेखन व ग्रंथ प्रकाशन या धंद्यात यश मिळेल. परोपकारबुध्दि असेल. मन मोठे असेल. उच्च दर्जाचे साहित्य व गायनकला ह्यांची आवड असेल. सदैव समाधानी वृत्ती राहील. उच्च शिक्षणात यश मिळेल व दीर्घ प्रवास होईल. विद्वान व रसिक लोकांचा सहवास लाभेल. गुणग्राहकता अंगी असेल.

(१०) जन्मकुंडलीमध्ये दशमस्थानी शुक्र असेल तर उद्योगधंद्यात चांगले यश मिळेल. मातृ, पितृसौख्य दीर्घ काल मिळेल. नोकरीस असणाऱ्या लोकांना वरिष्ठांची मर्जी सहज प्राप्त होईल. मानसन्मान व ऐषआराम या गोष्टी नोकरीमध्ये सुद्धा प्राप्त होतील. दशमस्थानी शुक्र असणारे लोक सोने, चांदी, जवाहीर रेशमी वगैरे तलम कापड ह्या वस्तूंच्या व्यापारामध्ये यशस्वी होतात. त्यांच्या आयुष्यात महत्वाच्या घडामोडी घडतात. शुक्र-बुध, शुक्र-चंद्र, शुक्र-शनि असतील तर दुधात साखर पडेल.

(११) जन्मकुंडलीमध्ये एकादशस्थानी शुक्र असेल तर त्याला अनेक प्रकारचे लाभ होतील. अनेक मौल्यवान वस्तु तो संग्रहीत करील. मित्र पुष्कळ व चांगले मिळतील. त्यांत कलावंत मित्रही असतील. या ठिकाणी शुक्र बिघडलेला असेल तर व्यसनी मित्र मिळून तो व्यसनाधीन होईल व संपत्तीचा दुरूपयोग होईल.

(१२) जन्मकुंडलीमध्ये द्वादश स्थानी शुक्र असेल तर ह्या शुक्रामुळे अपकीर्ती होण्याचा संभव, चैनी व पैशाच्या बाबतीत उधळे असतात. अशुभ ग्रहांनी बिघडला असता व्यसनी व विलासी होण्याचा संभव असतो. डोळयांमध्ये अधूपणा किंवा तिरळेपणा असण्याचा संभव असतो. ज्याप्रमाणे पैसा खर्च होतो त्याहूनही जास्त प्रमाणात प्राप्ती असते. पापग्रहयुक्त शुक्र असल्यास अशा मुलाची पालकांनी काळजी घ्यावी.

# शिरडी क्षेत्री होणारा श्री राम-जन्म-सोहळा

श्रीसाईमंदिरी आज झुलतसे श्रीरामाचा झुला ।
सख्यानो । उत्सव पाहू चला । जाऊनी शिरडीला । सख्यानो उत्सव...
प्रातःकाळीं आबाल-वृद्ध ते जाती गोदावरी ।
सनई चौघडा लेजिम आदि वाद्यांचा गजरीं ।
स्कंधि कावड गोदाजळ आणूनी मंदिरी ।
साईप्रभुला स्नान घालण्या आतुर ते अंतरी ।
मांगल्याची मंगलमूर्ती भक्तास्तव । तो करूनी घेई स्नानाचा सोहळा ।
सख्यानो । उत्सव पाहू चला । जाऊनी शिरडीला ॥१॥ सख्यानो...
कीर्तन चाले प्रभुजन्माचे साई मंदिरात ।
आबाल-वृद्ध ते दंग होऊनी कथाकिर्तनात ।
माध्यान्हीला दिनकर येता क्षणैक स्थिर राहिला ।
झाला गजर एक झाला । रामजन्म झाला ॥ सख्यानो ॥२॥ सख्यानो...
दशरथनंदन रघुकुळे तिलक । कौसल्येचा सुकुमार ।
होऊनी आला या अवनीवर । जगत् चालक तो परमेश्वर ।
दुष्टांचा संहार कराया । भक्तांचा कैवारी ।
भूवरी अवतरला । सख्यानो । उत्सव पाहूचला ॥३॥ सख्यानो...
गुलाल उधळूनी साईमंदिरी । करती जयजयकार
सुंठवडा खडी साखर पेढे । आनंदाला येई उधान
जयघोषानें दाहीदिशांना । एकच गलबला
हातीं घेऊनी रेशमीं दोरीं । श्रीरामा हलवू झुला ॥ सख्यानो ॥४॥
भजन किर्तन रथ पालखी । लेजीम सिंग तुतारी ।
सनई चौघडा नृत्यगायन । चाले रात्रभरीं
गारूड भाऊड प्रवचन निरूपण । साईमंदिरी
रोशनाई ती पाहून वाटे । स्वर्गची भूवरी आला सख्यानो ॥५॥
उत्सव पाहू चला । जाऊनी शिरडीला । सख्यानो । उत्सव पाहू चला
श्रीसाईमंदिरी आज झुलतसे । श्रीरामाचा झुला ॥ सख्यानो...

सौ. सुशीलाबाई हजारे

# स्वप्नातच मी आज पाहिले ० ० ०

स्वप्नातच मी पाहिले
विनम्र भावे पूजन केले
हृदयी माझ्या
नित्य विराजो
तीच तुझी पाऊले
विठ्ठला -ध्रु-

बालरुप वटपर्णी शयनी
क्षीरसागरी होते. रमुनी
जग उद्धरिले ज्या चरणानी
विठ्ठला -१-

भीमरथीच्या पुण्य तटावर
पुंडलिकास्तव ठेवुनि कटिकर
युगे युगे राहिले विटेवर
पंढरपुर नटविले
विठ्ठला -२-

विठू नाचला संत संगती
एक तारिच्या तालावरती
दृश्य माझिया नयनावरती
रंगुनिया राहिले
विठ्ठला -३-

प्रेमाश्रूनी स्नान घातले
भक्तिपुज्य मी तुला वाहिले
अनन्यभावे शिर हे तुझिया
समचरणी ठेविले
विठ्ठला -४-

—नारायण चिपळूणकर

# माझ्या मनाची आस

साईनाथ माझा देव
तच्चरणी माझा भाव
तो मला प्रेरणा देतो
संकटी रक्षण करतो ॥ १ ॥
मी दास साईचा आहे
साईस सर्वदा पाहे
मनी माझ्या एकच ध्यान
मुखि सतत साईचें स्मरण ॥ २ ॥
लागता पाय शिर्डीला
भवताप लयाला गेला
ते रूप साईचें बघुनी
मन माझे गेले फुलुनी ॥ ३ ॥
करू वंदन साईचरणी
तन्नाम सतत ते स्मरणी
हे साई मज तारावे
भवबंधन हे तोडावे ॥ ४ ॥
तवचरणी प्रार्थना एक
पुरवावी माझी आस
उभवावे तव मंदीरा
मम हस्ते संगमनेरा ॥ ५ ॥

— श्रीकृष्ण गंधे

# चिदानंद देसाई

शरीर मंदिर–आत्मारमावर
पहा निरक्षून–स्वरूपी राहून
निजानंदीमन–गेले रे मोहून
स्वरुप ते पाही–चिदानंद हे साई ॥१॥
कुंभक रेचक होतो आपोआप ।
सूचक समर्थ सारी हा भवताप ॥
साईभक्ति करता–जळति पाप ।
राम नाम जप । पदरी घ्या माप ॥२॥

—सौ. माई आडकर

## ( १ ) श्रीसाईनाथांची आरती

( चाल – आरती ज्ञानराजा )

आरति साईनाथा । श्री दत्ता – अवधूता ॥
सेवितो भक्तिभावे । तुज परम् – आदिनाथ ॥ आरति... ॥ धृ ॥
शिरडीच्या पुण्यभूमी । असे नित्य तव वस्ती ॥
आम्ही हिंदभूवासी । येतो तव दर्शनाला ॥ १ ॥ आरति...
सोडुनि जाति-धर्मा । येतो सर्व तव दारी ॥
सेवितो मनोभावे । सुख आणि शांति घेण्या ॥ २ ॥ आरति..
भक्तांचा तूं कैवारी । त्यांची संकटे तूं हारी ॥
उदार तूं परमात्मा । देसी मुक्ती सर्वांना ॥ ३ ॥

— श्री. के आर बेडे

## श्रीसाई भूपाळी

उठा उठा साईनाथा
राम प्रहर झाला
भक्त भाविकांचा मेळा
महाद्वारी आला ॥ धृ ॥
सुरू सूर सनईचे ते
दूर देवळात
लाल रम्य प्राचीतूनी
उजळते प्रभात
चौघडा झणाणे देवा
जाग ये स्वराला...१
कुणी जनी जात्यावरती
आळविते ओव्या
कर्मभंगास देई साथ
एकतारि गाया
'तार' भक्तिची लागे ही
दुवा सांधण्याला...२
याच देहि याची डोळा
रूप ते पहावे
दैव फिरो कर्मा मागे
'राम' मी म्हणावे
नाथ तूं अनाथांचा ना ?
तुझी सर्व 'लीला'...३
तुझे नाम घेता टळती
लक्ष लक्ष फेरे
दास गणू सांगून गेले
तूच भक्ष सारे
कृपा कटाक्षाचा त्या
फक्त मी भुकेला !...४

— विनायक पाठक

# सद्भाव ओवी

हवन हे मनविकल्पांचे, प्राशवी सहनसिद्धांतें
आरंभविले मनुजाने, अनादिसे पासोनी ॥ १ ॥
कल्पित कार्यांची नांदी, माळ मिळता विकल्पांची
वेथवरी विटोनि जगी, धावी दैवाप्रती ॥ २ ॥
प्रतिकल्प हाच विकल्प, मना जाळी जो सर्वत्र
पुनश्च उरे केवळ दर्प, मनुजाचेही अंती ॥ ३ ॥
स्मृती स्मृतींच्या स्मृती, यातच जगते मनुजाती
वैराण धावत विकृती, या अपयशी संपती ॥ ४ ॥
तरी याच वोढाळ मना, खेचुनी मागुतीचा वना
भावना धरसी अर्पणा, मोक्षवेल जगती ती ॥ ५ ॥
धरी मनी भगवंत नाम, उजळेल मनदिशा जाण
आत्मसूर्यांचे चिंतन, सच्चिदानंद लक्षण ॥ ६ ॥

—नरेंद्र कृष्ण

# स्वानंदाचा आनंद

भक्तीच्या बागेत मेवा मिठाईंचीं उपवने
घ्या हो रसगुल्याचा स्वाद
श्रद्धेचीं ठेवा बर्फी
स्वानंदाचे वाटा पेढे
मनाच्या ओंजळीत वळा मोतीचूर लाडू
गव्हा पोळीत पुरणाचा गोळा
भक्तीचा सोहळा वेगळा
लुटा विश्वाचा आगळा
निश्चयाचा तुकडा अति कडक वेगळा
सोनहलवा तो परि मुखात टाकिता विरघळला पुरा
मनाचि मुरलीं बवळिते बासुंदी
तिचीं चवच वेगळी
जिलेबीचीं कळा मनाला पाडी भुरळ
केशरी भाताचा सुटला सुगंध
स्वानंदाचा आनंद लुटून जाहला जीव धुंद.

सौ. कळावती व. चव्हाण

# साई तुझे चरण

साई तुझे चरण ।
दिसू दे नेत्रीं रात्रंदिन ॥ ध्रु० ॥
फिरफिरले जे अवधे भुवन
शिर्डी केली ज्यांनी पावन
ठाम राहिले तिथेच स्थिरावुन
द्यावया भक्तांना दर्शन ॥ १ ॥
अंतर्यामी नित्य स्मरिता
भावभक्तीने आणि पूजिता
जे उद्धरति दीन पतिता
तयांना देऊनि संजीवन ॥ २ ॥
धूळ पदांची लाविन भाळीं
ठरेल वाली संकट काळीं
श्रद्धा माझी ऐशी भोळी
पद नव्हेत, आनंदघन ॥ ३ ॥
तव चरणांची महती महान
गीतांतुनिया मी गाईन
प्रीत् वातीचे लावुन ठेविन
तेवत निरांजन ॥ ४ ॥

—दत्ताराम आ. बारस्कर

# पावन केले

पावन केले पतितांना अन् पावन केले शिरडी क्षेत्र
तुम्हा पाहता आनंदाने भरून आले माझे नेत्र
वदनावरती तेज मुलायम शतकोटी जणु सूर्य तळपती
तुमच्या चरणी सुख आगळे नित्य मुखाने करितो स्तुती
स्मरणची करिता लोप पावती असंख्य पापेही
नित्य मला आधार वाटतो नम्र सदा पायी
मूर्ती तुमची पुढती दिसता दोन्ही माझे कर जुळती
" जय श्री सद्गुरु साईबाबा " स्वर ही निनादती
सद्गुरु तुम्ही, तुम्हीच तारू, मार्ग तुम्ही दावा
तिन्ही त्रिकाळी करितो तुमचा अखंड मी धावा
देह वसो हा तुमच्या चरणी, मुखी तुमचे नाम
रात्रंदिन हा आत्मा गातो तुमचे गुणगान
जयास नाही कुणी तयाला तुम्हीच आधार
नित्य साहता तुम्ही संकटी भक्ताचा भार

— प्रकाश सहस्रबुद्धे

# विठ्ठल विठ्ठल साई

विठ्ठल विठ्ठल साई श्रीहरी
असेल साई घरोघरी ॥ध्रु०॥
होतो गजर साई मंदिरी
भक्त गणांचा तो कैवारी
गोदावरीच्या तिरावरी
उभा दिसे साई हरी ॥ १ ॥
आई बापाची सेवा करिता
साई मूर्ति त्यांत दिसता
त्या मूर्तिचे वेड लागता
साई हृदयीं पहा बसता ॥ २ ॥
शिर्डी गांवी साई आला
फकिर वेषी सर्वांनी पाहिला
कुणी ठेवी नांवे त्याला ॥ ३ ॥
साईबाबा मनांत ओळखे
स्वप्नामध्यें जात होते
भक्तास आणि आपुल्या दारी
दिसे भक्तासी विठ्ठल साईहरी ॥ ४ ॥
उद्धव म्हणे बाबा साई
सत्वरी धावत आता येई
दर्शन मजला सत्वर देई
हीच विनंती तुझे पायी ॥ ५ ॥

साईदास :- उद्धव भावसार

# साईभक्तांचा कैवारी

साईभक्तांचा कैवारी-शिर्डी राहे ग्रामांतरी ॥
द्वारकामाई रम्यस्थान-विसरती देहभान ॥
दृष्टी देई सर्वांवर-भक्त पाहे निरंतर ॥
दत्त साई रमावर-भक्तावरी प्रेम फार ॥१॥
अनुभव तोच येतो-साई संकटी तारतो ॥
सर्वाभूती साई वसतो-भक्ता अनुभव येतो ॥
साई अखंड भूवर । घ्या प्रचिती वारंवार ॥
छत्र धरी मजवरी । लिला विनंती करी ॥२॥

सौ. लिला पंडितराव देशमुख

# आईचा धांवा

तु माय मी लेकरू
साईबाबा तुला कसा विसरू ॥
आठवण तुझी मनास होता
चैन नसे बा माझ्या चित्ता
बालक धुंडे आपुली माता
करून टाहो सुरू ॥ साईबाबा तुला ॥
दाही दिशा मग दिसे ऊदास
भेटीसाठी लागे आस
नयन फिरवी चार दिशेस
भरूनी प्रेम आश्रु ॥ साईबाबा तुला ॥
मन बावरे धुंडीत राही
कोठे आहे आमुचा साई
टाहो फोडुनी हाक मारतो
सांग काय करू ॥ साईबाबा तुला ॥
दत्तु म्हणे साईनाथा
दिन दुबळ्यांचा तु आहे दाता
तुच आमुचा माता पिता
चरण कुणाचे धरू ॥ साईबाबा तुला ॥

— श्री. दत्ताराम मोरे

# — शिरडीद्वारी —

मन माझे धावे शिरडीद्वारी
नयनांत मूर्त दाटे मनोहर प्यारी !
'भाव – सुमनांनीं' करावी आरती
चित्तशुद्धी त्याने नित व्हावी
'साईकृपे' ने जीवनवेल ही फुलावी
भक्तांवरी जयांची असे प्रित न्यारी ! ॥ १ ॥
शिरडी पंढरपूर, साई विठ्ठलची !
दुजे विष्णु, दुजी तीर्थ काशी
जिथे सद्‌गुरू सदाची वसती
धरता चरण भेटती स्वर्ग साती !
जाता मंदिरी मम मन संतोषते
मांगल्यप्रकाशे अंतरंग प्रदिपते
राग, द्वेष पुरे देखता साईमुर्ति
दैन्य दूर सरे, अशी साई किर्ती ॥ २ ॥

— श्री. श्रीधर प्रभुणे

# शिरडीतील महत्त्वाचे उत्सव

(१) **गुढीपाडवा**--चैत्र शु. प्रतिपदेपासून शिरडी येथे बाबांच्या समाधीसमोर अनेक उत्सव साजरे केले जातात. सुरुवात होते ती गुढीपाडव्याने. या दिवशी बाबांच्या मंदिरावर ध्वजारोपण म्हणजे गुढी उभारण्यात येते. श्रीच्या समाधीस अभिषेक, पुरण पोळीचा महानैवद्य, श्रीच्या मूर्तीस, समाधीस भरजरी किनखापी व उंची मखमलीचा पोषाख चढविण्यात येतो. सायंकाळी रथाची मिरवणूक निघते व शेवटी भारूडाचा कार्यक्रम होतो.

(२) **रामनवमी महोत्सव**—चैत्र शु. नवमी. हा उत्सव श्री बाबांनी स्वतःच सुरु केला. तो त्यांच्या प्रेरणेने ह. भ. प. दासगणूमहाराज साजरा करीत. नंतर त्यांच्याच प्रेरणेने त्यांचे शिष्य ह. भ. प. अनंतराव आठवले हे शिरडीत येऊन स्वतः कीर्तन कार्यक्रम करून उत्सव उत्तम प्रकारे साजरा करतात. श्रीसाईबाबा रामनवमी उत्सव स्वतः साजरा करीत असत. तो जेव्हा पूर्व स्वरूपात होता तेव्हा फार थोड्यांनाच कळत असे. त्यावेळी या उत्सवाची पद्धत अशी होती की पहाटेला उठून बाबा स्वतः मशिद धूत असत. दुपारी बाराचे सुमारास थोडे तेल आणून दिवे लावत व पैसा अधेल्याचा गुलाल आणून धुनीवर व आपल्या डोक्यावर मशिदीतील तीन पणत्यावर कोपऱ्यात, व कमानीत उधळीत. पुढे बाबांचे देखत मशिदीपुढे कथा, कीर्तने व रामजन्म होऊ लागला व जन्म झाल्यावर स्वतः श्रीबाबा पेढे, बर्फी अशी मिठाई वाटत आणि काला कीर्तनाने शेवटी उत्सवसमाप्ती होत असे.

(३) **श्रीगुरु पौर्णिमा**—आषाढ शु. पौर्णिमा हा व्यास पूजेचा दिवस. महर्षि श्रीव्यासांच्या कालापासून या दिवशी गुरूच्या पूजा करून गुरुंना वस्त्रे देण्याची वहिवाट असल्याचा दाखला पुराणातही सापडतो. शिरडीस स्वतः बाबांनी या पूजेचे महत्त्व आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे अपरोक्ष मार्गाने सांगितले. इ. सन १९०८ मध्ये श्री. लक्ष्मण कृष्णाजी उर्फ तात्यासाहेब नूलकर सबजज्ज मु. पंढरपूर हे रजा घेऊन शिर्डीस राहिले होते. त्यांचा मुक्काम चावडीत होता. एके दिवशी बाबा सकाळीच माधवराव देशपांडेना म्हणाले, "त्या म्हाताऱ्याला म्हणावे की, या खांबाची पूजा कर. (तात्या नूलकरांना बाबा म्हातारा म्हणत) पूजेकरिता जो खांब बाबांनी दाखवला तो धुनीजवळचा. त्याला टेकून बाबा कित्येकदा बसत. नूलकरांना व माधव-

राबांना हा काय प्रकार आहे हे प्रथम ध्यानात येईना. नूलकरांनी पंचांगात काही खुलासा मिळतो की काय हे बघण्यासाठी पंचांग पाहिले तेव्हा तो दिवस व्यासपूजेचा म्हणजे गुरु पूजेचा आहे असे आढळून आले. अशा या महत्वाच्या दिवशी खांबाची का होईना पण मशिदीत पूजा करण्याचा योग आल्यामुळे त्यांना अत्यानंद झाला. माधवराव देशपांडे पुन्हा मशिदीत गेले तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, “ तोच काय एकटा पूजा करतो. तुलाही करायला काय झाले ? ” माधवराव म्हणाले, “ आपण खांबाची पूजा नाही करणार. जर तुम्ही करू द्याल तर तुमची मात्र पूजा करेन. ” शेवटी नाही होय करता करता बाबांनी पूजा करण्याची परवानगी दिली. बाबांचे एक परमभक्त श्री. दादासाहेब केळकर यांना गुरुपौर्णिमेच्या पूजेची माहिती होती. तात्या गणपत पाटील (कोते) शेतावर गेले होते. त्यांना बोलावून आणले गेले. सर्व मंडळींनी पूजेचे सामान तयार केले, धोतरे आणिवली व सर्वांनी प्रत्यक्ष श्री. बाबांची पूजा करून त्यांना वस्त्रे दिली. पण त्या वस्त्रांचा बाबांना काय उपयोग ! आपल्या भक्तमंडळीना गुरु पौर्णिमेस गुरूची पूजा करण्याचा योग यावा व पुढे तो परिपाठ चालू रहावा यासाठी हे सारे लाघव श्री बाबांनी केले व अशारीतीने ही पूजा सुरु झाली; व नंतर या समारंभास मोठ्या उत्सवाचे स्वरूप आले. आज हा उत्सव मोठ्या थाटाने तीन दिवस साजरा केला जातो.

**(४) श्रीसाईबाबांचा पुण्यतिथी उत्सव**— ज्या विभूतीने आपल्या भक्तांकरिता, आपल्या भक्तांचे कल्याण करण्यात आपला देह कष्टविला, त्या विभूतीच्या स्मरणार्थ त्यांची पुण्यतिथी साजरी करणे प्रत्येक भक्ताचे आद्य कर्तव्य आहे. पूर्व परंपरा पाहिल्यास गुरु ब्रम्हीभूत झाल्यावर त्यांची सेवा करण्याचा हा एकच मार्ग आहे. श्रीबाबांनी विजया दशमी दसरा दिनांक १५ आक्टोबर मंगळवार इ. सन १९१८ रोजी दोन प्रहरी सुमारे २ वाजून ३५ मिनिटांनी देह ठेविला. त्यामुळे तीच वेळ इष्ट काल धरून त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी आरंभी होणारा आराधनाविधी त्याच दिवशी सुरु करण्यात आला. श्री बाबांनी आपला देह एकादशीला (त्यावेळी एकादशी होती.) ठेवला, अर्थात दशमीतून एकादशीत सीमोल्लंघन करून दसरा साजरा केला. असा हा श्रीसाईबाबांचा पुण्यतिथी उत्सव शिरडीत तीन दिवस चालतो. रथ मिरवणूक निघते व भारूड कार्यक्रम पण होतो.

**(५) कोजागिरी पौर्णिमा**—आश्विन शु. पौर्णिमेस रात्री समाधीवर अभिषेक होतो. नंतर चंद्राची पूजा केली जाते. प्रत्येक उत्सवाला पालखीची

वा रथाची मिरवणूक गावातून निघते. श्रीबाबांच्या हयातीतील आलेल्या शेवटच्या गुरु पौर्णिमेच्या दिवशीही बाबांनी रथ मिरविण्याची परवानगी दिली होती. रथाची मिरवणूक, दारूसामान व वाद्यांच्या गजरात थाटाने होते. दीक्षित वाड्यासमोर ती काही वेळ थांबते. तिथे भजन व भारूड म्हणणे होऊन मिरवणूक समाधिमंदिरात येते. तिथे शेजारती होऊन कार्यक्रम संपतो.

(६) **दत्तजयंती** — मार्गशीर्ष पौर्णिमा. श्री साईबाबा हे भगवान दत्तात्रेयाचा अवतार समजले जातात. यामुळे त्यांच्या जयंतीचा उत्सवही शिरडीत थाटाने साजरा होतो. रात्री रथाची मिरवणूक निघून भारुडाचा कार्यक्रम होतो.

(पान ८ वरून)

श्रीबाबाच प्रत्यक्ष बसले आहेत असा भास होतो. मूर्तीची स्थापना १९६० साली महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. मारोतराव कन्नमवार ह्यांच्या हस्ते झाली. मूर्तीच्या पाठीमागे भिंतीवर एक इलेक्ट्रिकचे भव्य ॐ बसविलेले तोरण असून पुढ्यात दोन समया रात्रंदिवस जळत असतात. ह्या समयांना लागूनच दोन्ही बाजूंच्या लाकडी चौकटीवर श्री साईचरित्रातील प्रमुख प्रसंग पुठ्ठ्याच्या साह्याने चित्रित केलेले आहेत. श्री बाबांच्या उजव्या हाताला एका लाकडी स्टँडवर त्यांचा दत्तस्वरुपात छोटासा संगमरवरी पुतळा आहे. आजूबाजूच्या भिंतीवर सर्वत्र निरनिराळ्या देवतांच्या तसबिरी लावलेल्या आहेत.

मंदिराचे मालक श्री. काशिनाथपंत त्रिंबक दळवी यांना सर्वजण नानासाहेब ह्या नावाने ओळखतात—रत्नागिरी जिल्ह्यातील जानवली ह्या गावचे ते. त्यांचे आजोबा

# श्रीबाबांचे बोल

(१) बाजवीपेक्षा फाजील खाऊ नका किंवा उपोषणाने देहाला दंडू नका. खाण्यापिण्यात नेमस्तपणा पाळगा.

(२) ज्याच्याकडून पापी व दुष्ट कृत्ये घडतात त्याचे परिणाम त्याला भोगावे लागतात.

(३) तुम्ही स्वतःच्या आचरणाने इतरांपुढे उच्च आदर्श ठेवा. तुमचे उदाहरण इतरांस गिरविण्याची स्फूर्ति व्हावी.

(४) दुसऱ्याचे सुख पाहून दुःखी होऊ नका. सुखी व्हा. दुसऱ्याचे सुख ते स्वतःचेच सुख माना, व आहे त्या स्थितीत समाधान मानून रहा.

(५) तुम्हाला सुख, समाधान व शांती पाहिजे ना, मग पापे करू नकात. पापापासून नेहमी दूर रहा.

(६) शब्दाने किंवा हत्याराने दुसऱ्याला जखमी करणे हे महान पाप आहे आणि दुसऱ्याला प्रेमात जोडणे हे महापुण्य आहे.

(७) इतरांनी तुमच्याशी जसे वागावे असे तुम्हाला वाटते तसेच तुम्ही इतरांशी वागा.

(८) गोरगरिबांना मदत करा, भुकेलेल्यांना अन्न द्या. आणि ज्यांना आसरा नसेल त्यांना आसरा द्या. या तिन्ही गोष्टी स्वेच्छेने करण्यात महापुण्य आहे.

(९) कुणाचे होऊन रहावे किंवा कुणाला आपले करून रहावे.

(१०) देव किंवा ईश्वर या नावाची एक महान शक्ती अस्तित्वात आहे हे निश्चित त्रिवार सत्य आहे.

(११) सबुरी सद्गुणांची खाणी, सद्विचार रामाची ही राणी. निष्ठा आणि सबुरी या सख्ख्या बहिणी, जीवप्राण दोघींशी.

# शिरडी वृत्त – माहे फेब्रुवारी सन १९७५

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. रविवार, गुरुवार व सुटीचे दिवशी बरीच गर्दी होती काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन** :— संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.

२) ह. भ. प. गणपत बुवा जावळे मु. डोंबरी, जि. बीड.
३) ह. भ. प. त्र्यंबकबुवा पा. चकोर मु. कारेगांव, बार्शी.
४) ह. भ. प लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी.

**प्रवचन** :— श्रीमती प्रभावती राजे ग्वाल्हेर, यांचे प्रवचन झाले.

भजन : १) श्रीमती लीलाताई शं गोलतकर, नवानागपाडा, मुंबई
२) श्री. बी. जी. रॉय व भजन मंडळी, खार, मुंबई.
३) श्री. मालराज पिल्ले, साईदरबार, जबलपूर.
४) श्री. एस. के. डुबे व भजनमंडळी, मद्रास.
५) श्री तुलचुरीबाबू व भजन मंडळ, गुंटुर.
६) श्री. शंकरदास टे. आनंदाणी व भजन मंडळ, जि. ठाणे.
७) श्रीसाईसेवा भजन मंडळ, विजयवाडा.
८) श्री. प्रभाकर भ. पोतदार, जि. अकोला.
९) श्री. के. व्ही. रमणमूर्ती व भजन मंडळ, मच्छलीपट्टण

**गायन** :— १) श्री. जी. बी. ठाकरे, पवई, मुंबई. २) श्री. प्रभाकर कृ. अंभारे, नागपूर. ३) श्रीमती उषा ज. धानी. सांताक्रुझ, मुंबई.

माननीयांच्या भेटी :—

१) मा. श्री. विलासराव पाटील, उपजिल्हाधिकारी, अहमदनगर.
२) मा. श्री. पी. के सावंत. प्रांताध्यक्ष, महाराष्ट्र, मुंबई.
३) मा. श्री. एस. जी. दैठणकर IAS जिल्हाधिकारी, कोल्हापूर,
४) मा. श्री. एस. व्ही. संघत, जॉईन्ट सेक्रेटरी, शेती व पाटबंधारे, भारत सरकार, न्यू. दिल्ली.
५) मा. श्री. एन. एम. निंबाळकर IAS. डायरेक्टर ऑफ शुगर महाराष्ट्र.
६) मा. श्री. ए. आर. अंतुले, कायदा व बांधकाम मंत्री महाराष्ट्र मुंबई.
७) मा. श्री. रामराव बा. आदीक, ॲडव्होकेट जनरल, महाराष्ट्र, मुंबई.
८) मा. श्री. एम. जी. वाघ, आय. जी. पी. महाराष्ट्र, मुंबई.

**हवापाणी** :— शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

Regd. No. MH/BYE/26

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |
| ४½" × ५½" | रु. ०-३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १-२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३२.०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **पांडुरंग भोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.